दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२९३ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शुक्रवार, १२ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-


## कल्याणमध्ये श्रीकांत शिंदेंच्या विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरु



■ठाणे, विशाल कारंडे :

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या युवासेनेने कल्याण डोंबिवली लोकसभा मतदारसंघात विधानसभानिहाय निरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. त्यामुळे कल्याण लोकसभेसाठी शिवसेनेने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

कल्याण लोकसभेच्या सहा विधानसभा मतदारसंघांत शिवसेना शिंदे गटाने विधानसभा निरीक्षकांच्या दोनच दिवसांपूर्वी नेमणुका केल्या होत्या. आता युवासेनेतून कळवा-मुंब्रा विधानसभेतील कळवा निरीक्षकपदी प्रसाद कळसुले, मुंब्रा निरीक्षकपदी अश्फाक चौधरी, डोंबिवली विधानसभा निरीक्षकपदी निखिल वाळेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा निरीक्षकपदी विकेश भोईर, कल्याण पूर्व विधानसभा निरीक्षकपदी नितेश गजमल, उल्हासनगर विधानसभा निरीक्षकपदी हेमंत पमनानी आणि अंबरनाथ विधानसभा निरीक्षकपदी उत्कर्ष आर्या यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कळवा-मुंब्रा विधानसभा मतदारसंघात कळवा आणि मुंब्रा भागासाठी स्वतंत्र निरीक्षक नेमण्यात आले असून, तरुण नेत्यांची ही सर्व फळी ठाण्यातील आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवासेनेच्या माध्यमातून संघटना मजबूत करणे, पक्षाची ध्येय धोरणे तरुण वर्गापर्यंत जास्तीत जास्त प्रमाणात पोहोचवणे, नवमतदारांपर्यंत पोहोचणे अशा जबाबदाऱ्या या निरीक्षकांवर राहणार असल्याची माहिती युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी दिली.

## उमेदवार साताऱ्याचा, टेन्शन मात्र ठाणे मावळच्या उमेदवारांना



> सातारा जिल्ह्यातील कोणतीही निवडणूक असली की माथाडी कामगार मूळगावी धाव घेतात. लोकसभेपेक्षा माथाडी कामगार विधानसभा निवडणुकीच्या वेळी जास्त प्रमाणात गावी जातात. यावेळी माथाडी नेत्याला उमेदवारी मिळाल्याने गावी जाणाऱ्या कामगारांची संख्या मोठी असू शकते. यामुळे ठाणे, मावळच्या सर्व उमेदवारांना नक्कीच डोकेदुखी होऊ शकते.
> -नरेंद्र पाटील, सरचिटणीस, माथाडी युनियन

■नवी मुंबई, प्रतिनिधी:

महाविकास आघाडीने साताऱ्यातून माथाडी नेते आ. शशिकांत शिंदे यांना उमेदवारी दिली आहे. महायुतीकडून छत्रपती उदयनराजे, नरेंद्र पाटील इच्छुक आहेत. ठाणे लोकसभा मतदारसंघात मोडणाऱ्या ऐरोली आणि बेलापूर या दोन विधानसभा मतदारसंघांसह मावळ लोकसभा मतदारसंघात मोडणाऱ्या उरण आणि पनवेल या विधानसभा मतदारसंघांत माथाडी कामगारांची संख्या ५० हजारांवर आहे.

यापैकी बहुतेक कामगार मतदानासाठी गावी जातील. ठाणे, मावळ मतदार संघांतील महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे टेन्शन वाढले आहे. ऐरोली, बेलापूर, पनवेल आणि उरण या चारही विधानसभा मतदारसंघांतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा-बटाटा, भाजीपाला मार्केट, फळमार्केट, साखर-मसाला मार्केटसह दाणा बंदर या पाच बाजारपेठा, एमआयडीसीतील विविध कंपन्या, शीतगृह, कळंबोलीतील स्टील मार्केट, सीडब्ल्यूसीची गोदामे, उरणच्या जेएनपीए बंदरातील विविध टर्मिनल, कंटेनर यार्डमध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांची संख्या मोठी आहे.

हे कामगार पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यांतील आहेत. त्यातही सातारा लोकसभा मतदारसंघात मोडणाऱ्या कऱ्हाड, पाटण, जावळी या विधानसभा क्षेत्रांतील गावागावांचे मूळ रहिवासी आणि नवी मुंबईत राहणाऱ्या कामगारांची संख्या जास्त आहे.

## 'बोट' कंपनीच्या ग्राहकांचा डेटा लीक




■नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

एअरबडस आणि स्मार्ट वॉच बनवणाऱ्या बोट या गॅजेट पंपनीच्या ग्राहकांसाठी धोक्याची घंटा आहे. याचे कारण म्हणजे बोट कंपनीच्या सुमारे ७५ लाख ग्राहकांची वैयक्तिक माहिती लीक झाली आहे. हॅकर्सने बोट कंपनीच्या युजर्सचा पर्सनल डेटा चोरी करत लीक केला आहे. बोट कंपनीच्या ग्राहकांचा डेटा डार्क वेबवर लीक झाल्याचं निदर्शनास आलं आहे. बोटच्या ग्राहकांसाठी ही धोक्याची घंटा आहे. लीक झालेल्या माहितीमध्ये ग्राहकांची वैयक्तिक माहिती आहे. रिपोर्टनुसार, सुमारे ७.५ मिलियन म्हणजे सुमारे ७५ लाख ग्राहकांचा डेटा लीक झाल्याचं बोललं जात आहे. बोट कंपनीचा डेटा लीक झाल्याने लाखो भारतीय ग्राहकांची वैयक्तिक माहिती सायबर गुन्हेगारांच्या हाती लागू शकतो. फोर्ब्स इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, ५ एप्रिल २०२४ रोजी बोट कंपनीच्या लाखो युजर्सचा वैयक्तिक डेटा डार्क वेबवर आढळला आहे. लीक झालेला डेटा अतिशय संवेदनशील आहे, कारण यामध्ये ग्राहकांची वैयक्तिक माहिती आहे. बोट कंपनीच्या 75 लाखांहून अधिक युजर्सचा डेटा डार्क वेबवर अपलोड करण्यात आला आहे. यामध्ये संवेदनशील, वैयक्तिक माहितीचा समावेश आहे. डार्क वेबवर ७५ लाख ग्राहकांचा डेटा सापडला आहे. ढक्कम्हणजे या डेटामध्ये ग्राहकाचं नाव, पत्ता, फोन नंबर, ई-मेल आयडी, ग्राहक आयडी आणि इतर अनेक माहिती समाविष्ट असते. बोट कंपनीच्या ७५ लाख ग्राहकांचा डेटा लीक झाला आहे. याशिवाय शॉपी फाय नावाच्या हॅकरने या डोटा लीकची जबाबदारी स्वीकारली असून चोरीचा डेटा डार्क वेबवर अपलोड केला आहे. सध्या, या डेटा लीकबाबत बोट कंपनीकडून कोणतीही अधिकृत माहिती किंवा स्पष्टीकरण देण्यात आलेलं नाही. डार्क वेबवर युजर्सचा डेटा लीक होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही, फेसबुक (मेटा), मायक्रोसॉफ्ट आणि अगदी गुगलच्या लाखो वापरकर्त्यांचा डेटा डार्क वेबवर लीक झाला आहे.

## दरडी कोसळणाऱ्या ठिकाणांवर मनपाचे २५ नियंत्रण कक्ष राहणार तयार



■मुंबई, विशाल पाटील :

मुंबईतील पूर्व उपनगरांमध्ये पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका असलेली संभाव्य ठिकाणे आहेत. या ठिकाणांवर 'वॉच' ठेवण्यात येणार आहे, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. मुंबई शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांत २५ विभाग पातळीवर नियंत्रण कक्ष कार्यरत आहेत. हे समर्पित नियंत्रण कक्ष सर्व उपकरणांसह सुसज्ज ठेवावेत, अशा सूचना महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सर्व सहायक आयुक्तांना दिल्या आहेत. पावसाळ्यात दरडी कोसळून अपघात होऊ नये, यासाठी संबंधित ठिकाणी संरक्षक भिंती बांधण्याचे काम विविध यंत्रणांच्या माध्यमातून सुरू आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी पातळीवर योग्य समन्वय साधून आवश्यक उपाययोजना कराव्यात. २४ विविध प्रशासकीय विभागांत आपत्कालीन घटनांची आणि त्या पार्श्वभूमीवर आवश्यक मदत यंत्रणेची गरज भासू शकते. या पार्श्वभूमीवर कक्षामध्ये आवश्यक साधन सामग्री आणि उपकरणे पुरवली जाणार आहेत. जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत कार्य करता येईल, असे पालिकेकडून सांगण्यात आले. राडारोड्याचा अडथळा नको- एमएमआरडीएच्या अखत्यारीतील विविध कामे आणि मेट्रो रेल्वे इत्यादी प्रकल्पांच्या ठिकाणी राडारोडा पडून राहणार नाही, याची जबाबदारी संबंधित यंत्रणेने घ्यावी. त्याचबरोबर वाहतूक पूर्ववत होण्याकामी, स्थानिक कामे झाल्यावर बॅरिकेड्स काढावीत, याबाबतची माहिती संबंधित यंत्रणांना द्यावी, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत. पूर्व, पश्चिम द्रुतगती महामार्ग सुस्थितीत ठेवा- मुंबई पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावरील देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी पालिकेवर आहे. त्यामुळे दोन्ही द्रुतगती मार्ग सुस्थितीत असावेत, याची खबरदारी मध्यवर्ती यंत्रणेसह सहायक आयुक्त आणि उपआयुक्तांनी घ्यावी, अशा सूचना पालिका प्रशासनाकडून देण्यात आल्या.

## तिसऱ्या मुंबईविरोधात आता १२४ गावांतून २५ हजार हरकती




> मुंबईला जोडून असलेल्या या क्षेत्रात स्थानिक आगरी कोळी शेतकरी भातशेती, मत्स्य व्यवसाय करतो. सरकारने वेगवेगळ्या प्राधिकरणाद्वारे विकास योजना राबवण्याचे प्रयत्न केले होते. सिडको, नवी मुंबई विमानतळ बाधित शेतकऱ्यांची ससेहोलपट सुरू आहे. शेतकऱ्यांचे उपजीविकेचे साधन संपून ते भूमिहीन होतील, अशा कुठल्याही विकास योजनेला शेतकरी एकजूट होऊन विरोध करणार आहेत. त्यासाठी न्यायालयीन लढाईसाठी तयार आहे.
> -रुपेश पाटील, समन्वयक, शेतकरी संघर्ष समिती

■नवी मुंबई, सचिन कदम :

अटल सेतू प्रभावित उरण, पेण आणि पनवेल तालुक्यांतील १२४ गावांमध्ये तिसरी मुंबई उभारण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियुक्तीला स्थानिकांनी तीव्र विरोध केला आहे. १२४ गावांतून २६ हजार ८४३ रहिवाशांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवित कोकण भवन येथे हरकती दाखल केल्या आहेत. हरकती नोंदविणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या २५ हजारांहून अधिक असल्याची माहिती एमएमआरडीए भूसंपादन विरोधी समितीचे समन्वयक रुपेश पाटील यांनी दिली.

नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्रातील ८० गावे, खोपटा नवनगर अधिसूचित क्षेत्रातील ३३ गावे, मुंबई महानगर प्रादेशिक योजना क्षेत्रातील २ गावे आणि रायगड प्रादेशिक योजना क्षेत्रातील ९ गावे, अशा एकूण १२४ गावांचा समावेश नवनगर विकास प्राधिकरणात करण्यात आला आहे. अटल सेतू प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होण्यासाठी अटल सेतू प्रभावित क्षेत्रातील ३२३.४४ चौरस किमी क्षेत्रातील गावांचा विकास आता एमएमआरडीए करणार आहे. राज्य सरकारने त्याची अधिसूचना ४ मार्चला जाहीर केली. मात्र, या प्रकल्पाला स्थानिक रहिवाशांनी तीव्र विरोध दर्शविला आहे.

ऐन लोकसभा निवडणुकीआधी जाहीर केलेल्या या योजनेला स्थानिकांनी विरोध दर्शविला आहे. त्यामुळे या १२४ गावांमध्ये निवडणुकीतही हा मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे एमएमआरडीएच्या नवनगर विकास प्राधिकरणाला मोठा विरोध होणार असून, त्यावरून राजकारण तापणार असल्याचे चिन्ह दिसून येत आहे. ...त्याचवेळी ही योजना आणली

- मागील कित्येक दशकांपासून गावाचा विस्तार झालेला नाही. सरकारने आधी गावाचा गावठाण विस्तार करावा, तसेच या विस्तारित गावठाणातील दुरुस्त केलेले, तसेच मूळ गावठाणाबाहेर बांधलेले घर नियमित करून त्यास सनद द्यावी, तसेच उदरनिर्वाहकरिता बांधलेले वाणिज्य वास्तू आणि शेतात बांधलेले घर नियमित करावे, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.
- एकीकडे स्वमालकीच्या जमिनीवर बांधलेले घर नियमित केले जात नाही. त्याचवेळी ही नवी योजना आणली जात आहे, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

## मुंबई मेट्रोमध्ये आता स्मार्ट बँड घालून तिकिटाविना प्रवास करणे शक्य



■मुंबई, यश सावंत :

वसोर्वा - घाटकोपर मेट्रो १ मार्गिकेवर सतत तिकिट काढण्यापासून प्रवाशांची सुटका होणार आहे. हातात घातलेल्या स्मार्ट बँडच्या (रिस्टबँड) साहाय्याने प्रवाशांना तिकिटाविना प्रवास करणे शक्य होणार आहे. मुंबई मेट्रो वन प्रशासनाने (एमएमओपीएल) हे हातात घालता येईल, अशा टॅप-टॅप विअरेबल तिकीट लाँच केले आहे.

मनगटावर परिधान केलेले स्मार्ट बँड मेट्रोस्थानकाच्या प्रवेशद्वारावरील एएफसी गेटवर स्कॅन करताच प्रवाशांना स्थानकात प्रवेश मिळणार आहे. त्यामुळे प्रवाशांना तिकीट हातात बाळगण्याची किंवा मोबाइलद्वारे क्यूआर कोड स्कॅन करून स्थानकात प्रवेश करण्याची गरज पडणार नाही. प्रवाशांना हा स्मार्ट बँड २०० रुपयांना मिळणार असून, ते रिचार्ज करता येणार आहे. हे नावीन्यपूर्ण तिकीट मुंबई मेट्रो वन स्थानकांच्या सर्व ग्राहक सेवांमध्ये उपलब्ध केले आहे, अशी माहिती मेट्रो वन प्रशासनाने दिली.

हे तिकिट पर्यावरणपूरक साहित्यापासून तयार केले आहे, तसेच ते बॅटरीशिवाय चालत असून, जलरोधक आणि सहज वापरता येण्याजोगे आहे, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले. मेट्रो वन मार्गिका सुरू झाल्यापासून गेल्या १० वर्षांत ९५० दशलक्ष प्रवाशांनी या मार्गिकेवरून प्रवास केला आहे. सद्यःस्थितीत मेट्रो वन मार्गिकेवर दरदिवशी ४१८ फेऱ्या होत असून, या माध्यमातून सुमारे ४ लाख ६० हजार प्रवासी प्रवास करत आहेत.

मेट्रो वनने प्रवाशांच्या सोयीसाठी कॉम्बो कार्ड, मोबाइल क्यूआर तिकिट, लॉयल्टी रिवार्ड्स प्रोग्राम, प्रवास पास यासारख्या सुविधा दिल्या आहेत, तसेच काही महिन्यांपूर्वीच व्हॉट्सअॅप ई-तिकीटची सुविधा दिली आहे. आता हातातील बँडद्वारे तिकिट काढण्याची सुविधा प्रदान केल्यामुळे प्रवाशांच्या वेळेची आणखी बचत होणार आहे. सद्यःस्थितीत मेट्रो १ मार्गिकेवरून २ लाख८५ हजार प्रवाशांकडून डिजिटल तिकीट प्रणालीचा वापर करून प्रवास केला जात आहे. त्यामध्ये ९० हजार प्रवासी मोबाइल क्यूआर कोड प्रणालीचा वापर करत आहेत. आता स्मार्ट बँड पद्धत लागू केल्याने डिजिटल तिकीट प्रणालीचा वापर करणाऱ्यांची संख्या आणखी वाढेल, अशी आशा मेट्रो वनकडून व्यक्त केली जात आहे.

## डेटिंग ॲपवरील महिलेशी ओळख पडली सव्वा कोटींना



■ नवी मुंबई,भावना जैन :

डेटिंग ॲपद्वारे महिलेशी झालेली ओळख एका व्यक्तीला सव्वा कोटीला पडली आहे. महिलेने सदर व्यक्तीसोबत ओळख वाढवून फॉरेक्स ट्रेडिंगचा माध्यमातून नफा मिळवून देण्याच्या बहाण्याने हि रक्कम हडपली आहे. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस अधिक तपास करत आहेत. खारघर परिसरात राहणाऱ्या ४५ वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे. एका नामांकित कंपनीत ते उच्च पदावर आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी मोबाईलमध्ये डेटिंग ॲप्लिकेशन घेतले होते. त्यावर एका महिलेसोबत त्यांची ओळख झाली होती. या महिलेने त्यांच्यासोबत ओळख वाढवून आर्थिक गुंतवणुकीबद्दल चौकशी केली होती. त्यामध्ये सदर व्यक्तीने फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावरून महिलेच्या नावे त्यांच्यासोबत चॅटिंग करणाऱ्याने त्यांना दोन ॲप्लिकेशन पाठवले होते. त्यावर तक्रारदार यांनी सुरवातीला पाच लाख रुपये भरले होते. काही दिवसातच या गुंतवणुकीतून त्यांना मोठा नफा झाल्याचे ॲप्लिकेशन मधील आलेखात दिसून आले. यामुळे त्यांनी टप्प्या टप्प्याने एकूण १ कोटी २२ लाख रुपये भरले होते. यातून त्यांना अडीच कोटींचा नफा झाल्याचे सांगितले जात होते. त्यामुळे सदर रक्कम त्यांनी काढून घेण्याची इच्छा व्यक्त केली असता त्यांच्याकडे वेगवेगळ्या शुल्कच्या नावाखाली लाखो रुपयांची मागणी होऊ लागली. अखेर सव्वा कोटी रुपयांना फसल्यानंतर त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. यामळे त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली असता नवी मुंबई सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जबरदस्तीने पैसे मागणाऱ्या तृतीयपंथी, भिकारी यावर पुणे पोलीस करणार कारवाई



■ पुणे,अभिजीत येरुल्लू :

शहरात एकत्र जमून रस्त्यावरील सिग्नल तसेच घरोघरी दुकानांवर जाऊन जबरदस्तीने पैसे मागणाऱ्या तृतीयपंथीयांसह भिक्षेकऱ्यांवर आता कारवाईचा बडगा उचलला जाणार आहे. जबरदस्तीने पैसे मागितल्याचा प्रकार समोर आल्यास अशा तृतीयपंथी भिक्षेकऱ्यांवर पोलिस ठाण्यात गुन्हादेखील दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. आयुक्त म्हणाले, 'तृतीयपंथी लोक व भिक्षेकरी नागरिकांच्या कार्यक्रमाच्या, लग्नाच्या ठिकाणी जाऊन, रस्त्यावर सिग्नलला कारच्या काचा बंद असतानाही घरोघरी, दुकानांवर जाऊन जबरदस्तीने पैसे मागत असल्याच्या तक्रारी आमच्याकडे आल्या होत्या. याचे वादही विकोपाला गेल्याचे काही घटनांवरून समोर आले होते. त्याच पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तांनी अशा पद्धतीने तृतीयपंथी, भिक्षेकरी लोक पैसे मागत असतील तर त्यांच्या विरोधात खंडणी, बेकादेशीर जमाव, नागरिकांना त्रास होईल असे वर्तन करणे अशा विविध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचेही आयुक्तांनी सूचित केले आहे. त्यामुळे त्यांना एकत्रित येऊन व वैयक्तिकरीत्या शहरात घरोघरी, दुकानांच्या ठिकाणी, लग्न, उत्सव, वाढदिवस अशा ठिकाणी पैसे मागण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्याबरोबरच सिग्नलला, चौकात जबरदस्तीने पैसे मागण्यास बंदी घालण्यात आली आहे. १२ एप्रिलपासून हा आदेश लागू करण्यात येणार आहे.

## अनधिकृत बांधकामांवर जीपीएस माध्यमातून ठेवणार नजर



■ठाणे, नितीन देवळेकर :

शहरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी यापुढे जीपीएस सॅटेलाईट प्रणालीचा अवलंब करावा. अनधिकृत बांधकाम शहरात होत असल्याचे निदर्शनास येताच ते तत्काळ निष्कसित करण्याच्या स्पष्ट सूचना आयुक्तांनी सहाय्यक आयुक्तांना दिल्या आहेत. वनविभाग, खार जमिनीच्या जागेवर नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामांबाबत संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करुनही कारवाई न झाल्यास त्या ठिकाणी महापालिकेच्या माध्यमातून कारवाई करण्याच्या सूचनाही आयुक्त सौरव राव यांनी यावेळी दिल्या. शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून सुटलेला नाही. विशेष करून खाडीच्या पलिकडे कळवा, मुंब्रा आणि दिवा परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकामे झाली असून महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी कळव्यातील अनाधिकृत बांधकामे, नालेसफाई तसेच पाणीपट्टी वसुलीचीचा आढावा घेतला. ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून कळवा परिसरात झालेली व होत असलेली विकास कामे तसेच संपूर्ण शहराची भौगोलिक परिस्थिती, कळवा पूर्व परिसरातील पारसिक डोंगर व तीन बाजूंनी वेढलेला खाडी किनारा या दृष्टीने शहराचे क्षेत्रफळ आदी सर्व माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून आयुक्त सौरभ राव यांनी जाणून घेतली. सद्यस्थितीत कळवा प्रभाग समितीच्या माध्यमातून मालमत्ता करवसुली ७५ टक्के व पाणीपट्टी ६२ टक्के असल्याबद्दल आयुक्तांनी नाराजी व्यक्त करीत पाणीपट्टी व मालमत्ता करवसुली १०० टक्के झालीच पाहिजे या दृष्टीने कृती आराखडा करण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी यावेळी दिले. प्रभाग समितीत नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचा आढावा घेवून ज्या तक्रारींचा निपटारा प्रभाग समिती स्तरावर करणे शक्य आहे तो जलदगतीने करावा. तसेच तक्रारीचा निपटारा झाल्यावर संबंधित तक्रारदाराला त्याची माहिती देण्यात यावी. तसेच ज्या तक्रारी मुख्यालयामार्फत सोडविणे आवश्यक आहे, त्या संबंधित विभागाकडे वर्ग कराव्यात. शहरात होणाऱ्या अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण यांचा मासिक अहवाल तयार करुन तो सादर करण्याचे निर्देशही सहाय्यक आयुक्तांना सदर बैठकीत देण्यात आले.

## मराठी नवीन वर्षात नवीन गाडी... ठाण्यात ३४०६ वाहनखरेदी



■ ठाणे, दिगंबर जाधव :

साडेतीन मुहूर्तांपैकी एक समजल्या जाणाऱ्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ठाण्यात मंगळवारी १०५ वाहनांची खरेदी झाली. यामध्ये ८४ दुचाकी तर २१ चारचाकी वाहनांचा समावेश आहे. १ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत ३४०६ वाहनांची खरेदी झाली असून, यामध्ये सर्वाधिक २३१३ दुचाकींचा समावेश असल्याची माहिती ठाण्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांनी दिली. गुढीपाडवा, अक्षयतृतीया आणि दसरा या शुभ मुहूर्तावर वाहन घरी आणण्यासाठी नागरिकांची रेलचेल असते. विशेषतः गुढीपाडव्याच्या दिवशी वाहन, वस्तू खरेदी शुभ मानली जाते. हा मुहूर्त साधत अनेकजण घर, सोने, वाहन आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची खरेदी करतात. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर वाहन खरेदी करण्यासाठी नागरिक काही दिवसांपूर्वीच आगाऊ बुकिंग करतात. या वाहनांची ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंद होते. त्यांनतर ग्राहक मुहूर्तावर आपली वाहने घरी घेऊन जात असतात. त्यामुळे १ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात ३ हजार ४०६ नवीन वाहनांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये २ हजार ३१३ दुचाकी तर, ७९४ कारची संख्या आहे. गुढीपाडव्याचा मुहूर्त साधत अनेक जण मनोभावे आपल्या वाहनाची पूजा करून वाहन घरी नेताना दिसले. नवीन खरेदी केलेल्या वाहनासोबतचा फोटोसुद्धा अनेकांनी आपल्या सोशल मीडियाच्या अकाउंटवर टाकल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेकांनी गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येलाच आपले वाहन घरी नेले. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ठाणेकरांनी गेल्या दहा दिवसांपासून वाहन खरेदी करण्याची तयारी केली होती. ही सर्व वाहने ठाणेकर आपापल्या घरी नेण्याच्या तयारीत असणार, हे जाणून ठाण्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाने आणि कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी वर्गाकडून विशेष परिश्रम घेण्यात आले.

**वाहन प्रकार – खरेदी वाहने :** दुचाकी - २३१३, चारचाकी - ७४९, रिक्षा ६४, कॅब - २०, मालवाहू - २२२, बस - ६, इतर - २१४ = एकूण ३४०६

## सोनसाखळी चोरणाऱ्या अट्टल चोरटयास पोलीसांनी केली अटक



■ ठाणे,रोहित जैसवाल :

वर्तकनगर भागात चोरी करुन फरार झालेल्या अब्बास शहाजोर सय्यद (२४, रा. आंबिवली, कल्याण) या अट्टल इराणी चोरट्याला अटक केल्याची माहिती वर्तकनगर पोलिसांनी दिली. त्याच्याकडून ठाणेनगर आणि मुलूंड भागातून चोरलेल्या दोन सोनसाखळ्या आणि एक मोटारसायकल हस्तगत केली आहे.

वर्तकनगर भागात चोरी करुन पसार झालेले दोघेजण नवी मुंबईतील ऐरोली भागात येणार असल्याची माहिती वर्तकनगर पोलिसांना मिळाली होती. त्याच माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजकुमार वाघचवरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक सागर गोंटे यांच्या पथकाने ८ एप्रिल २०२४ रोजी मानकोली गावापुढे ओहोळी गावाजवळील हायवेवर सापळा रचून एका दुचाकीवरील दोघांना दुचाकीसह ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांच्यापैकी एकजण तिथून पसार झाला तर ताब्यात घेतलेल्यास दुचाकीसह वर्तक नगर पोलिस ठाण्यात आणण्यात आले.

चौकशीमध्ये अब्बास सय्यद असे त्याचे नाव असल्याची माहिती समोर आली. अंगझडतीमध्ये त्याच्या पॅन्टच्या खिशातून काळे मणी असलेले सोन्याच्या मंगळसुत्राचे दोन तुकडे आणि एक सोनसाखळी मिळाली. त्यापैकी काळे मणी असलेले सोन्याचे मंगळसूत्र हे या दोघांनी ८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ठाणे नगर पोलिस ठाण्याच्या परिसरातून एका महिलेच्या गळ्यातून खेचून घेतल्याची कबुली दिली. दुसरी सोनसाखळी त्यांनी कोणाकडून जबरीने चोरी केली, याचा तपास करण्यात येत आहे. या गुन्ह्यामध्ये वापरलेली दुचाकी मुलुंड पोलिस ठाण्याच्या भागातून चोरल्याचीही माहिती तपासात समोर आली.

अब्बास हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध खडकपाडा, बदलापूर आणि नया नगर तसेच मुंबईतील जुहू पोलिस ठाण्यातही गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्यावर अटकेची कारवाई केली असून त्याला दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश ठाणे न्यायालयाने दिले आहेत.

# उकडवून स्वादिष्ट कॉर्न बॉल्स बनवा

स्वीट कॉर्नपासून अनेक प्रकारचे पदार्थ बनवता येतात. लोकांना भुट्टा देखील आवडतो आणि तो आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकतो. स्वीट कॉर्न चवीला काहीसा गोड असतो. ते उकडवून खाऊ शकता किंवा काही स्नॅक्स देखील बनवू शकता. थाई स्वीट कॉर्न रेसिपी देखील बनवू शकता. ही रेसिपी करायला खूप सोपी आहे. चला तर मग साहित्य आणि कृती जाणून घेऊ या.

**साहित्य :** कणीस, लेमन ग्रास (लेमन ग्रासचे भारतीय नाव), लिंबाचा रस, बेकिंग पावडर, काळी मिरी, करी पेस्ट, नारळ पावडर, कॉर्न फ्लोअर आणि मीठ.

**पाककृती :** वाफवलेले कॉर्न बॉल्स बनवण्यासाठी कॉर्न पाच मिनिटे उकडवा. आता कॉर्नमधील पाणी पिळून घ्या. नंतर उकडलेले कॉर्न ग्राइंडरमध्ये बारीक करून पेस्ट तयार करा. या कॉर्न पेस्टमध्ये नारळाची दूध पावडर, चिरलेला लेमनग्रास, लिंबाचा रस, हिरवी करी पेस्ट, कॉर्नफ्लोअर, बेकिंग पावडर, काळी मिरी पावडर आणि मीठ घाला.

सर्व साहित्य चांगले मिसळा आणि या मिश्रणाचे छोटे गोळे बनवा. कॉर्न बॉल्स स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटे शिजवा. स्टीम कॉर्न बॉल्स तयार आहेत. चटणीसोबत सर्व्ह करा.



# या ‘3’ घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा !

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून पाहा.



### कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

**कसा बनवाल**

▮कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.

▮rq मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

### पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

**कसा कराल हा पॅक**

▮एक पीच आणि टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.

▮यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.

▮तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.

▮अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.

### ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

**कसा बनवाल मास्क**

▮एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.


▮त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.

▮या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.

▮त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.

▮हा उपाय नियमित करा.





# केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

**उन्हाळ्याची** काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.



उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. अँटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो.

उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.

# ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

**सकाळी** उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या.

ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवनाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे राहिडिक ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे आहे.



# पासवर्ड आठवतच नाहीये ? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पर्यायापेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.

**स्मार्ट लॉकसह अनलॉक करा :** हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

**ऑन-बॉडी डिटेक्शन :** येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.



**विश्वसनीय ठिकाणे :** तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

**विश्वसनीय उपकरणे :** विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

**विश्वासार्ह चेहरा :** फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

**व्हॉइस मॅच :** तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

# केजीएफ फेम यशने नाकारली ‘रामायण’मधील रावणाची भूमिका अन् ८० कोटींची ऑफर



नितेश तिवारी दिग्दर्शित ‘रामायण’ या आगामी चित्रपटाची गेल्या काही महिन्यांपासून चर्चा रंगली आहे. या चित्रपटात प्रभू श्रीरामाच्या भूमिकेत अभिनेता रणबीर कपूर, सीतेच्या भूमिकेत दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी आणि हनुमानाच्या भूमिकेत सनी देओल झळकणार आहे.

याशिवाय रावणाच्या भूमिकेत दाक्षिणात्य सुपरस्टार, ‘केजीएफ’ फेम यश दिसणार असल्याचं म्हटलं जात होतं. पण आता यशने रावणाची भूमिका आणि ८० कोटींची ऑफर नाकारल्याचं समोर आलं आहे.

अलीकडेच ‘रामायण’ या चित्रपटाचं शूटिंग नितेश तिवारी यांनी सुरू केलं आहे. शूटिंग सुरू होण्यापूर्वी रणबीर कपूर ट्रेनिंग घेताना दिसला होता. इन्स्टाग्रामवर रणबीरच्या ट्रेनरने एक व्हिडीओ शेअर केला होता. ज्यामध्ये अभिनेता खूप मेहनत करताना दिसत होता. एकाबाजूला ‘रामायण’ चित्रपटासाठी जोरदार तयार सुरू असताना दुसऱ्या बाजूला यशने मोठा निर्णय घेतला आहे.

‘झूम’च्या वृत्तानुसार, ‘रामायण’ चित्रपटात यश रावणाच्या भूमिकेत दिसणार नाहीये. एका सूत्राने सांगितलं, यशने रावणाची भूमिका नाकारून फक्त निमार्ता म्हणून चित्रपटाचं काम पाहणार आहे. अभिनेत्यानं ८० कोटींची ऑफर नाकारली आहे. त्यामुळे आता यश ‘रामायण’ चित्रपटात निर्मात्याच्या भूमिकेत असणार आहे.

दरम्यान, ‘एएनआय’ या वृत्तसंस्थेनुसार, ‘रामायण’मधील कुंभकरणाच्या भूमिकेसाठी अभिनेता बॉबी देओलशी संपर्क केला आहे. पण अजूनपर्यंत हे निश्चित झालेलं नाही. तसंच रावणाचा छोटा भाऊ विभीषणची भूमिका अभिनेता विजय सेतुपति साकारू शकतो.

याशिवाय लारा दत्ता, शीबा चड्ढा देखील ‘रामायण’ चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार असल्याचं म्हटलं जात आहे. लारा कैकेयी तर शीबा मंथराची भूमिका साकारणार आहे. बहुचर्चित व बहुप्रतीक्षित ‘रामायण’ चित्रपट दिवाळी २०२५मध्ये प्रदर्शित होऊ शकतो.

# दै. लोकरक्षणाय सुडोकू - ५४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | 7 | 3 | | | 5 | 6 | |
| 8 | 1 | 3 | | | | | | 2 |
| | | 6 | | | | | | |
| 3 | | 2 | | | 1 | | 9 | |
| 5 | 4 | | 6 | | 3 | 1 | | 8 |
| | 6 | | | | 5 | | | 4 |
| | 3 | 5 | 8 | 2 | | | | 7 |
| | | | 1 | | | 2 | | |
| | 8 | | | | | 4 | | |

### उत्तर सुडोकू -५३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | 1 | 4 | 6 | 2 | 9 | 7 | 3 |
| 9 | 6 | 4 | 7 | 3 | 5 | 1 | 8 | 2 |
| 2 | 7 | 3 | 8 | 9 | 1 | 4 | 5 | 6 |
| 3 | 8 | 6 | 2 | 1 | 7 | 5 | 9 | 4 |
| 1 | 9 | 5 | 3 | 4 | 8 | 6 | 2 | 7 |
| 7 | 4 | 2 | 9 | 5 | 6 | 8 | 3 | 1 |
| 4 | 2 | 9 | 1 | 8 | 3 | 7 | 6 | 5 |
| 5 | 3 | 8 | 6 | 7 | 4 | 2 | 1 | 9 |
| 6 | 1 | 7 | 5 | 2 | 9 | 3 | 4 | 8 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# ‘जीव माझा गुंतला’ फेम योगिता-सौरभने गुपचूप उरकला साखरपुडा

## पहिल्यांदाच शेअर केले फोटो अन् सांगितली तारीख



योगिता चव्हाण आणि सौरभ चौघुले यांची जोडी ‘जीव माझा गुंतला’ या मालिकेमुळे घराघरांत लोकप्रिय झाली. मालिका संपल्यावर यारील जोडीने खऱ्या आयुष्यात लग्नगाठ बांधत सर्वांना सुखद धक्का दिला होता. ३ मार्चला विवाहबंधनात अडकल्याचा फोटो शेअर करत योगिता-सौरभने रीअल आयुष्यात ‘हमसफर’ झाल्याचं चाहत्यांना सांगितलं.

लग्नबंधनात अडकल्यावर हळुहळू या दोघांनी सर्व विधींचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले होते. त्यांच्या लग्नाला अलीकडेच एक महिना पूर्ण झाल्यावर या जोडप्याने खास विवाहसोहळ्यातील Unseen व्हिडीओ शेअर करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. या व्हिडीओमध्ये चाहत्यांना त्यांच्या हळद, संगीत सेरेमनची झलक पाहायला मिळत आहे. परंतु, अद्याप योगिता किंवा सौरभने त्यांच्या साखरपुड्याचे फोटो शेअर केले नव्हते किंवा तारीखही सांगितली नव्हती.

योगितने नुकतीच शेअर केलेली इन्स्टाग्राम पोस्ट सध्या चर्चेत आली आहे. यामध्ये अभिनेत्री साखरपुड्याचे फोटो शेअर करत हा सोहळा केव्हा पार पडला होता याची तारीख सांगितली आहे. योगिता आणि सौरभचा साखरपुडा फेब्रुवारी महिन्याच्या ११ तारखेला पार पडला होता. कारण, अभिनेत्रीने फोटो शेअर करत त्यावर “साखरपुडा ११.०२.२०२४” असं कॅप्शन दिलं आहे.

दरम्यान, साखरपुडा सोहळ्याला योगिताने सुंदर अशी लाल रंगाची साडी नेसून त्यावर मल्टीकलर ब्लाऊज परिधान केला होता. तर, सौरभने शेरवानी परिधान केली होती. सध्या चाहते त्यांच्या फोटोंवर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत.

# दिनविशेष

### १२ एप्रिल

- १६०६: ग्रेट ब्रिटनने युनियन जॅक ला राष्ट्रीय ध्वज म्हणून मान्यता दिली.
- १९३५: प्रभात चा चंद्रसेना हा हिंदी चित्रपट मुंबईच्या मिनर्व्हा चित्रपटगृहात प्रदर्शित झाला.
- १९४५: अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट यांचे कार्यालयात असतानाच निधन झाले.
- १९६१: रशियाचे युरी गागारिन अंतराळात भ्रमण करणारे पहिला अंतराळवीर असून त्यांनी १०८ मिनिटात पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण केली.
- १९६७: कैलाशनाथ वांछू भारताचे १० वे सरन्यायाधीश झाले.
- १९९७: भारताचे पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी राजीनामा दिला.
- १९९७: पूर्वप्राथमिक प्रवेशाकरिता पाल्य अथवा पालकांच्या मुलाखती घेण्यास मनाई करण्याची तरतूद असणारे विधेयक विधानसभेत मंजूर करण्यात आले.
- १९९८: सी. सुब्रमण्यम यांना भारतरत्न प्रदान करण्यात आला.
- २००९: झिम्बाब्वेने अधिकृतरीत्या झिम्बाब्वेचे डॉलर हे चलन सोडून दिले.
- ५९९: ५९९ ई.पुर्व : जैनांचे २४ वे तीर्थंकर महावीर यांचा जन्म.
- १३८२: मेवाडचा महापराक्रमी राजा संग्रामसिंग ऊर्फ राणा संग यांचा जन्म.
- १८७१: लेखक, भाषांतरकार, पत्रकार, संपादक, अनुवादक, निबंधकार व कोशकार वासुदेव गोविंद आपटे यांचा जन्म. (मृत्यू: २ फेब्रुवारी १९३०)
- १९१०: सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक पु. भा. भावे यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९८०)
- १९१४: संवाद व गीतलेखक कृष्ण गंगाधर दिक्षीत ऊर्फ कवी संजीव यांचा जन्म. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९९५)
- १९१७: सलामीचे फलंदाज तसेच डावखुरे मंदगती गोलंदाज विनू मांकड यांचा जन्म. (मृत्यू: २१ ऑगस्ट १९७८)
- १९३२: श्रीलंकेचे परराष्ट्रमंत्री तामिळ नेते लक्ष्मण कादिरगमार यांचा जन्म.
- १९४३: केंद्रीय मंत्री सुमित्रा महाजन यांचा जन्म.
- १९५४: मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिग्दर्शक, कवि आणि गीतकार सफ्दर हश्मी यांचा जन्म. (मृत्यू: २ जानेवारी १९८९)
- १९८८: SEBI ची स्थापना
- १७२०: बाळाजी विश्वनाथ भट तथा पहिला पेशवा यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १६६२)
- १८१७: फ्रेंच खगोलशास्त्रज्ञ चार्ल्स मेसिअर यांचे निधन. (जन्म: २६ जून १७३०)
- १९०६: महामहोपाध्याय पण्डित महेशचंद्र न्यायरत्न भट्टाचार्य यांचे निधन. (जन्म: २२ फेब्रुवारी १८३६)
- १९१२: अमेरिकन रेड क्रॉस च्या स्थापक कारा बार्टन यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १८२१)
- १९४५: अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट यांचे निधन. (जन्म: ३० जानेवारी १८८२)

# भविष्य

**मेष** – कौटुंबिक सौख्यात रमाल. गरज नसतांना प्रवास करावा लागू शकतो. लहान मुलांच्यात रमून जाल. व्यावसायिक बदल लक्षात घ्यावेत.

**वृषभ** – ऐक्याची भावना जोपासाल. दिवस मनाप्रमाणे व्यतीत कराल. थोरांशी सल्ला-मसलत कराल. कामात चंचलता येईल.

**मिथुन** – मोकळेपणाने बोलणे टाळाल. पत्नीचा प्रेमळ सहवास मिळेल. झोपेची तक्रार दूर होईल. संसर्गजन्य आजारांपासून काळजी घ्यावी.

**कर्क** – उगाचच चंचलता वाढेल. फार विचार करत बसू नका. मनातील इच्छेला अधिक महत्व द्याल. जोडीदाराचा हट्ट पुरा कराल. जुने विचार मनातून काढून टाकावेत.

**सिंह** – कलेसाठी अधिक वेळ काढाल. सर्वांच्या कौतुकास पात्र व्हाल. कामात स्थिरता ठेवावी. गप्पांमध्ये वेळ घालवाल. पोटाची काळजी घ्यावी. हातातील कामात यश येईल.

**कन्या** – कामात जोडीदाराचा हातभार लागेल. प्रगतीची नवीन संधी उपलब्ध होईल. मुलांना नवीन गोष्टी शिकवाल. व्यायामाचे महत्व लक्षात घ्यावे. अपचनाचा त्रास जाणवेल.

**तुला** – काही कामे कमी श्रमात पार पडतील. घरातील वातावरण अस्वस्थ वाटू शकते. नवीन गोष्टी आमलात आणताना विचार करावा. अचानक धनलाभ संभवतो. धार्मिक ग्रंथांचे वाचन करावे.

**वृश्चिक** – गरज नसेल तर प्रवास टाळवा. जोडीदाराचे सौख्य वाढेल. नवीन गोष्टींकडे कल वाढेल. मोहाला बळी पडू नका. जवळचे मित्र भेटतील. भावंडांचे प्रश्न सामोरी येतील.

**धनु** – कौटुंबिक स्वास्थ्याला प्राधान्य द्यावे. नवीन लोकांशी संपर्क वाढेल. कामाचा आनंद घ्याल. लोकोपवादाला बळी पडू नका. जुन्या कामात प्रगती कराल. धैर्याने कामे हाती घ्याल.

**मकर** – मानसिक ताण जाणवू शकतो. सतत बडबड कराल. कमिशनचा विचार आधी कराल. आवडते पुस्तक वाचाल. रागावर नियंत्रण ठेवावे. कामात आळस आड येऊ शकतो.

**कुंभ** – तुमच्या स्मरणशक्तीचे कौतुक केले जाईल. घरातील साफसफाई कराल. काही सकारात्मक बदल कराल. आवडता छंद जोपासाल. सामुदायिक गोष्टीत लक्ष घालू नका. नवीन विचारांची कास धरावी लागेल.

**मीन** – उगाचच थकवा जाणवेल. सकारात्मक विचार करावेत. हस्तकलेत मन रमवावे. लबाड लोकांचा संग टाळवा. खोट्याचा आधार घेऊ नका. नवीन विचारांची कास धरावी लागेल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# आघाडीचे पुढचे पाऊल

'इंडिया' आघाडीतील पक्ष इतर राज्यांत परस्परांच्या विरोधात लढताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील 'मविआ'चे जागावाटप मार्गी लागणे ही बाब महत्त्वाची आहे. लोकसभा निवडणुकीच्या संग्रामात दुसऱ्या क्रमांकाच्या म्हणजे ४८ जागा असलेल्या महाराष्ट्राचे महत्त्व विशेष आहे. उत्तरेकडे भक्कम पकड जमविलेल्या भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्राचा 'पेपर' मात्र सोपा वाटत नाही, असे दिसते. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने जागावाटप जाहीर करणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. काही जागांवरील उमेदवार जाहीर व्हायचे बाकी असले तरी आघाडीने एक पाऊल पुढे टाकले आहे. सांगली, दक्षिण- मध्य मुंबई, भिवंडीसह काही जागांवरून आघाडीअंतर्गत धुसफुस सुरू असली तरी सगळ्याच प्रश्नांवर तोडगा काढत न बसता पुढे जाण्याचा निर्णय आघाडीच्या नेत्यांनी घेतल्याचे दिसून येते. त्याचमुळे आघाडीचे शिल्पकार, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी, आमच्यात मतभिन्नता नसल्याचे आणि एकजुटीने निवडणुकीला सामोरे जाण्यास सज्ज असल्याचे सांगितले. महाराष्ट्राच्या राजकारणात एका वेगळ्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आकाराला आली होती आणि त्याची मोठी किंमत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांना मोजावी लागली. त्यानंतरही तिन्ही पक्ष एकत्र राहिले आहेत. केंद्रीय पातळीवर विरोधी पक्षांची 'इंडिया' आघाडी आकाराला आल्यानंतर या आघाडीतील पक्ष देशाच्या विविध भागांमध्ये परस्परांच्या विरोधात लढताना दिसताहेत. मात्र, मतभेद असतानाही महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष एकत्र लढत आहेत, हे उल्लेखनीय. एका पक्षाने संपूर्ण जागा लढवायच्या ठरवल्या तरीसुद्धा अनेक जागांवर मतभेद असू शकतात. इथे तर चार वर्षांपूर्वीपर्यंत विरोधात असलेले पक्ष एकत्र आले आहेत. त्यामुळे मतभेद स्वाभाविक आहेत. सांगलीच्या जागेवरून दोन्ही बाजूंकडून खूप ताणण्याचा प्रयत्न झाला आणि त्याचा ताण आघाडीवर आल्याचे चित्र निर्माण झाले. परंतु काँग्रेसने नमते घेऊन शिवसेनेला पुढे चाल दिली आणि संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला. स्थानिक पातळीवर त्याची किंमत चुकवावी लागणार आहे, याची कल्पना असूनही काँग्रेसने ही तडजोड स्वीकारली. लोकसभा निवडणुकीत शिवसेना २१, काँग्रेस १७ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष १० जागा लढवणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. काँग्रेस आघाडीतला एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे. अशोक चव्हाणांसह चार-दोन नेते सोडून गेले असले तरी शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेससारखी मोठी फूट काँग्रेसमध्ये पडलेली नाही. विधानसभेतील संख्याबळाचा विचार केला तर तिथेही काँग्रेसचे संख्याबळ दोन्ही पक्षांहून अधिक आहे. असे असतानाही जागावाटपात शिवसेनेचे वर्चस्व दिसले. जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित होण्याच्या आधीच प्राथमिक चर्चेच्या आधारे शिवसेनेने परस्पर उमेदवार जाहीर करून टाकले, जे काँग्रेससाठी अडचणीचे ठरणार होते. काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी तक्रारीचा सूर लावला; परंतु त्याचा उपयोग झाला नसल्याचे अंतिम जागावाटपानंतर लक्षात येते. मोठ्या पक्षाने जो समजूतदारपणा दाखवायचा असतो तो काँग्रेसने इथे दाखवला. त्याची कारणे देशाच्या राजकारणात शोधावी लागतात. भाजपपासून डावे, तृणमूल काँग्रेसपर्यंत अनेक पक्ष काँग्रेसची कोंडी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गांधी कुटुंबीय हे सगळ्यांचे लक्ष्य आहे. अशा स्थितीत काँग्रेसला राष्ट्रीय पातळीवर काही लढाऊ सहकाऱ्यांची आवश्यकता आहे आणि ती गरज उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून पूर्ण केली जाऊ शकते. त्याचमुळे शिवसेनेने दादागिरी करूनही काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांनी ती गुमान सहन केली. काँग्रेसच्या सहनशीलतेचा शिवसेनेने गैरफायदा घेतला, असेही म्हटले जाऊ शकते. ज्या जागांवरून वाद होते, ते मागे टाकून महाविकास आघाडीने पुढे जाण्याचा निर्णय घेतला, एवढाच अर्थ त्यातून निघू शकतो. मात्र, समोर भारतीय जनता पक्ष आणि महायुती असताना त्यांच्याशी लढण्यासाठी पुरेशी मुत्सद्देगिरी आघाडीने दाखवलेली दिसत नाही. एकीकडे महायुतीकडून प्रत्येक जागा जिंकण्यासाठी त्या त्या ठिकाणची परिस्थिती लक्षात घेऊन पक्ष आणि उमेदवार निश्चित करण्यात येत असताना महाविकास आघाडीत मात्र जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याची ईर्षा दिसली. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी आघाडीला अखेरपर्यंत झुलवत ठेवले आणि अखेरच्या क्षणी वेगळी वाट धरली. आंबेडकर यांचा आजवरचा प्रवास पाहता त्याचा अंदाज आघाडीच्या नेत्यांना होता, परंतु अन्य पक्षांना सोबत घेण्यासाठी जी लवचिकता आणि बेरजेचे राजकारण करण्याची आवश्यकता होती, ते इथे दिसत नाही. दिंडोरीसारख्या ठिकाणी डाव्या पक्षांना एखादी जागा सोडणे किंवा राजू शेट्टी यांच्यासारख्या लढाऊ नेत्याला सोबत घेणे यासाठी फारसा उत्साह दाखवला गेला नाही. आंबेडकरी विचारसरणीच्या छोट्या-मोठ्या नेत्यांना सोबत घेण्यासाठीची रणनीतीही दिसली नाही. एकजुटीने लढताना आवश्यक असलेले 'सोशल इंजिनिअरिंग' करण्याची आघाडीला गरज वाटली नाही, ही बाब खटकतेच.

# ग्राहक हक्कांसाठी लढणाऱ्या मुंबई ग्राहक पंचायतीचा सुवर्णमहोत्सव

९ एप्रिल २०२४... गुढीपाडव्याला मुंबई ग्राहक पंचायत सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. खऱ्या अर्थाने सुवर्णाक्षरांत कोरावा असा हा अभिमानास्पद क्षण! ४९ वर्षांपूर्वीची- १९७५ सालची गोष्ट... मुंबई ग्राहक पंचायत ही स्वयंसेवी ग्राहक संस्था स्थापन झाली. नफेखोरी, काळाबाजार, भेसळ यामुळे त्रस्त झालेल्या असंघटित ग्राहकांना कुणीही यावे आणि लुटून न्यावे, कुणीही यावे आणि फसवून जावे अशी परिस्थिती. ग्राहकांच्या असंघटितपणाचा गैरफायदा घेणारी संघटित बाजारपेठ, व्यापारी वर्ग हा सगळाच अस्वस्थ करणारा माहोल. पण म्हणतात ना कोणत्याही समस्येला उत्तर हे असतेच. हा अस्वस्थपणा नेमका हेरला तो पुण्याच्या एका युवकाने. तो युवक म्हणजे बिंदू माधव जोशी, भारतीय ग्राहक चळवळीचे प्रणेते.

वरील सर्व समस्यांचे मूळ हे ग्राहक असंघटित असण्यात दडलेले आहे, हे त्यांनी ओळखले आणि त्यातून १९७४ साली पुण्यात उदयाला आली 'अखिल भारतीय ग्राहक पंचायत'. बिंदू माधव जोशी, सुधीर फडके यांनी पुण्यात सुरू केलेल्या ग्राहक चळवळीने खरे मूळ धरले ते मुंबईत. १२ एप्रिल १९७५ रोजी मुंबईत गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर संस्थेने ग्राहकांसाठीच्या कार्याची गुढी उभारली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते, प्रसिद्ध गायक, संगीतकार सुधीर फडके. त्यांना साथ मिळाली ती मधुकरराव मंत्री, पा. वा. गाडगीळ, अशोक रावत, आप्पासाहेब गोडबोले, रामभाऊ बर्वे, भाऊमामा गोगटे अशा उत्तमोत्तम धुरीणांची. या मंडळींना ग्राहकांच्या शोषणाचे मूळ सापडले होते आणि त्यावरचा उपायसुद्धा! असंघटित ग्राहकांना संघटित करण्याचे शिवधनुष्य या मंडळींनी पेलले. बिंदू माधव जोशी, सुधीर फडके यांनी संघटित ग्राहकांना 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावर दैनंदिन गरजेचे गहू, तांदूळ, डाळ, तेल यासारखे दर्जेदार शिधासाहित्य रास्त किमतीत दरमहा देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी नाममात्र शुल्क सुद्धा आकारले जाईल, हेदेखील निश्चित झाले आणि मग संस्थेची अक्षरशः घोडदौड सुरू झाली. बघता-बघता ग्राहक संघांद्वारे ग्राहक संघटन वाढू लागले. ग्राहक शोषण मुक्तीच्या दिशेने हळूहळू का होईना वाटचाल सुरू झाली, पण हे एकमेव उद्दिष्ट नव्हतेच! बिंदू माधव जोशी, हे ग्राहक चळवळीचे प्रणेते आणि त्यांना भरभरून साथ देणारी सुधीर फडके, पा. वा. गाडगीळ, गंगाधरराव गाडगीळ यांसारखी ज्येष्ठ, श्रेष्ठ मंडळी यांना केवळ मासिक वितरणावर समाधान मान्य नव्हते. शोषणमुक्तीचा हा लढा ग्राहकांच्या विविधांगांनी होणाऱ्या शोषणाविरुद्धचा होता. अनुचित व्यापारी प्रथा, बदलणारी जीवनशैली, विविधांगांनी विविध सेवांमधून होणारी ग्राहकांची फसवणूक यांविरुद्ध जनमत संघटित होण्याची गरज होती. हे ग्राहक चळवळीला अभिप्रेत असणारे महान कार्य होते. वितरणाबरोबरच ग्राहक चळवळ संघटित सदस्यांमुळे बळ धरू लागली.

मुंबई ग्राहक पंचायत भारतातीलच नव्हे तर आशियातील सर्वात जास्त सदस्य असलेली एकमेव स्वयंसेवी ग्राहक संघटना आहे. आजमितीस ३० हजार ग्राहक संस्थेचे सदस्य आहेत. जवळजवळ ८० कोटींची उलाढाल आहे. नाव मुंबई ग्राहक पंचायत असले तरीही, पालघर ते रत्नागिरीपर्यंत दूरवर पसरलेली ही आत्मनिर्भर ग्राहक संघटना आहे. स्वतःचे 'ग्राहक भवन' असलेली ही एकमेव ग्राहक संघटना आहे. सुरुवातीपासून सुधीर फडके, पा. वा. गाडगीळ, विद्याधर गोखले, पु. ल. देशपांडे, गंगाधरराव गाडगीळ, डॉ. पी. आर. जोशी, डॉ. रामदास गुजराथी आणि आता डॉ. बाळ फोंडके यांसारखे अत्यंत संवेदनशील, उच्चविद्याविभूषीत असे नेतृत्व संस्थेला लाभले. त्यामुळे संस्था केवळ वितरणात अडकून न पडता ग्राहक चळवळीत देशात आणि पार परदेशात सुद्धा अग्रेसर राहिली. संयुक्त राष्ट्रांपर्यंत संस्थेने झेप घेतली.

संस्थेचे वितरणातील सदस्य ही संस्थेची अमूल्य ठेव. त्यांच्याच बळावर आजपर्यंत संस्था कोणतीही सरकारी मदत न घेता आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि सक्षम वाटचाल करत आहे. संस्थेला आत्मनिर्भर होण्यासाठी ग्राहक पंचायत पेठा या उपक्रमाचाही महत्त्वाचा भाग आहेत. १९७८ साली या उपक्रमाचे बीज रोवले गेले. मुंबई आणि मुंबईबाहेर जवळजवळ ११ ठिकाणी पंचायत पेठेचे आयोजन संस्था करते. उचित व्यापारी प्रथांचा आग्रह धरत आयोजित केलेला हा समाजमान्य उपक्रम आहे. यातून मिळालेले उत्पन्न संस्थेच्या खचार्चा २५ टक्के भार उचलते. १९९० साली आपल्या देशात खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला. जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरणाचे वारे वाहू लागले. एका प्रचंड भोवऱ्यात अर्थव्यवस्था भिरभिरत राहिली. ग्राहकही त्यात भिरभिरत होता. नवीन जीवनशैलीत स्वतःला नेमके कुठे संरक्षित करावे या विचारात गोंधळला होता. पूर्वीच्या तुटवड्याच्या अर्थव्यवस्थेतून सावरलेला हा ग्राहक वर्ग आता जागतिकीकरणातून उदयाला आलेल्या समृद्धीमुळे अधिकच गोंधळला. पूर्वी टूथपेस्ट किंवा टूथ पावडर म्हटली की एखाद् दुसरा देशी ब्रँड समोर येत असे. आता प्रचंड पर्याय उपलब्ध झाले. नेमकी कशाची निवड कोणत्या निकषांवर करावी हेच कळेनासे झाले. उत्पादने आली की ती खपवण्यासाठी त्यांच्या जाहिरातीही येतात, मग भल्या-बुऱ्या, पोकळ दावे करणाऱ्या अतिरंजित जाहिरातींनी ग्राहकांना घेरले. आणि मग ग्राहक चळवळीसमोर ग्राहकाला जागृत आणि सक्षम करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले. मुंबई ग्राहक पंचायत या आव्हानाला सामोरी गेली. अनुचित जाहिरातींविरुद्ध मोहिमा, कायदेशीर लढाया आणि ग्राहक जागृतीचा मोठा कार्यक्रम संस्थेच्या 'ॲड वॉच क्लब'ने हाती घेतला. शाळा शाळांतून बालग्राहकांना जाहिराती कशा बघाव्यात 'आवडती जाहिरात, नावडती जाहिरात' यांसारखे अभिनव उपक्रम राबवण्यास संस्थेने सुरुवात केली. 'युनिसेफ'ने याची नोंद घेऊन आपले योगदान दिले.

या जाहिराती लहान मोठ्यांच्या मनावर गारुड करतात. त्यांची जीवनशैली बदलवण्याचा कार्यक्रम राबवतात. त्याचा मुलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन खाद्यान्नांच्या जाहिरातींच्या मुलांवर होणाऱ्या परिणामांचे सर्वेक्षण सहा देशांना मदतीला घेऊन यशस्वीरित्या पूर्ण करणारी एकमेव मुंबई ग्राहक पंचायत आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. गुटखा, तंबाखूच्या प्रचंड जाहिरातींविरुद्ध जनमत एकत्रित करून या जाहिरातींवर बंदी आणण्यासाठी १ लाख शाळकरी मुलांच्या सह्या राष्ट्रपतींना पाठवणारी एकमेव संस्था मुंबई ग्राहक पंचायत. अशी कितीतरी अभियाने संस्थेने राबवली. हे सर्व करताना संस्थेने आंतरराष्ट्रीय स्तरावरही ओळख निर्माण केली. १९९४ पासून या आंतरराष्ट्रीय प्रवासाला सुरुवात झाली. संस्थेचे आताचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी या आंतरराष्ट्रीय प्रवासात संस्थेला पुढे नेले.

१९९४ पासून मुंबई ग्राहक पंचायत आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्रिय झाली. 'कंज्युमर्स इंटरनॅशन'ल या जागतिक ग्राहक संस्थेची मुंबई ग्राहक पंचायत एक सक्रीय सदस्य आहे. १९९४, १९९७, २००० मधील जागतिक परिषदांमध्ये आणि त्यानंतरही मुंबई ग्राहक पंचायतीने आपले अस्तित्व आपल्या बहुआयामी कार्याने जगाला दाखवून दिले. २००० साली दक्षिण आफ्रिकेत केलेल्या एका सादरीकरणामुळे झिम्बाब्वेसारख्या अतिमागासलेल्या देशात मुंबई ग्राहक पंचायतीच्या वितरण व्यवस्थेचे प्रारूप प्रतिबिंबित झाले आणि त्यांनी हे प्रारूप तिकडे प्रत्यक्षात आणले गेले. २०१० साली फिजी या छोट्या देशाचा ग्राहक संरक्षण कायदा तयार करण्यात महत्त्वाची जबाबदारी युरोपीयन युनियनच्या एका प्रकल्पात संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांच्यावर सोपविण्यात आली. २०११ साली कंज्युमर्स इंटरनॅशनलच्या संचालक मंडळावर ॲड. देशपांडे यांची निवड झाली. त्यांच्या चार वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी केवळ संस्थेलाच नाही तर संपूर्ण देशाला अभिमानास्पद कामगिरी केली.

संयुक्त राष्ट्रांची ग्राहक संरक्षणाची मार्गदर्शक तत्वे १९८५ मधील आहेत. त्यात कालानुरूप सुधारणा होण्याची अतिशय गरज होती. १९८५च्या संयुक्त राष्ट्रांच्या ग्राहक संरक्षणाच्या मार्गदर्शक तत्वांमधे सुधारणा करण्यासाठी मुंबई ग्राहक पंचायतीने आग्रह धरला आणि कंज्युमर्स इंटरनॅशनलच्या मदतीने तो यशस्वी करून दाखवला. २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आम सभेने या सुधारित मार्गदर्शक तत्वांना मान्यता दिली. या सुधारणा करण्यात मुंबई ग्राहक पंचायतीचे सर्वांत महत्त्वाचे आणि कायमस्वरूपी योगदान असे होते, की या तत्त्वांची अंमलबजावणी संयुक्त राष्ट्र संघाची सर्व सदस्य राष्ट्रे करताहेत की नाही हे बघण्यासाठी एक कायमस्वरूपी देखरेख यंत्रणा असावी, ही सूचना मुंबई ग्राहक पंचायतीने कंज्युमर इंटरनॅशनलच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रांकडे केली होती. त्या मागणीला काही कारणाने प्रगत राष्ट्रांनी विरोधही केला, पण शेवटी तो डावलून केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या मदतीने संयुक्त राष्ट्रांच्या आम सभेने डिसेंबर २०१५ मध्ये या सुधारणांना मान्यता तर दिलीच त्याचबरोबर या सुधारित मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी प्रत्येक देशात होते की नाही हे बघण्यासाठी मुंबई ग्राहक पंचायतीने सुचविलेली कायमस्वरूपी देखरेख यंत्रणादेखील अंमलात आणण्यास मान्यता दिली. त्यानुसार २०१६ पासून आजवर दरवर्षी युनायटेड नेशन्सच्या जिनिव्हा येथील प्रांगणात जुलैमध्ये ही जागतिक ग्राहक संरक्षण परिषद भरते. ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने काय घडामोडी घडत आहेत, प्रत्येक देशात काय चाललेले आहे, ग्राहक संरक्षणाचे विविध कायदे आणि धोरणे काय आहेत, ग्राहक संरक्षणाच्या गरजा काय आहेत, त्यांच्यासमोर उभी असलेली आव्हाने काय आहेत हे बघण्यासाठी दर जुलैमध्ये जिनिव्हामध्ये भरणाऱ्या या जागतिक परिषदेत मुंबई ग्राहक पंचायत सातत्याने भरीव योगदान देत आलेली आहे.

## उथळसर प्रभाग समिती क्षेत्रात सोमवारी होणार पाणीपुरवठा बंद



**ठाणे, प्रातिनिधी :** ठाणे महानगरपालिकेच्या उथळसर प्रभाग समिती क्षेत्रात जल वाहिनी स्थलांतराच्या अत्यावश्यक कामामुळे सोमवार, १५ एप्रिल सकाळी ८ ते मंगळवार, १६ एप्रिल सकाळी ८ वाजेपर्यंत २४ तास पाणी पुरवठा बंद राहणार आहे. के व्हिला नाला पुलाच्या कामामुळे जेलच्या जलकुंभावरून पाणी पुरवठा करणारी मुख्य वितरण वाहिनी बाधित होणार आहे. त्यामुळे या जलवाहिनीचे स्थलांतर करून जोडकाम करण्यासाठी २४ तासांचा शटडाऊन पाणीपुरवठा विभागाने घेतला आहे. या शटडाऊनमुळे, उथळसर प्रभाग समिती क्षेत्रातील राबोडी क्र. १ व २, के व्हिला, आकाशगंगा, पंचगंगा, उथळसर, सेंट्र्ल जेल परिसर, पोलीस लाईन, तसेच, नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील एन. के. टी. महाविद्यालय परिसर, खारकर आळी, पोलीस हायस्कूल या भागात सोमवार, १५ एप्रिल सकाळी ८ ते मंगळवार, १६ एप्रिल सकाळी ८ वाजेपर्यंत २४ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे. या शट डाऊननंतर, पाणी पुरवठा पूर्व पदावर येईपर्यंत पुढील एक ते दोन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करावा आणि पाणी जपून वापरावे, असे आवाहन ठाणे महापालिकेने केले आहे.

# खड्ड्यांना 'मास्टिक'ची मलमपट्टी

## प्रयोगांना सोडचिठ्ठी देत नव्या प्रशासनाचे जुन्या पद्धतीलाच प्राधान्य

**मुंबई :** यंदा पावसाळ्यात खड्डे बुजवण्यासाठी डांबराच्या गरम मिश्रणाचा अर्थात मास्टिकचाच वापर करण्यात येणार आहे. कोल्डमिक्स आणि पालिका प्रशासनाने गेल्या काही वर्षात केलेले सर्व प्रयोग बाजूला ठेवून मास्टिकचा वापर करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यादृष्टीने पालिका प्रशासनाने निविदा प्रक्रिया सुरू असून लवकरच कार्यादेश देण्यात येणार आहेत. पूर्वी डांबराच्या अतिउष्ण मिश्रणानेच खड्डे बुजविण्यात येत होते. मग काही वर्षांपूर्वी पालिका प्रशासनाने कोल्डमिक्स म्हणजेच शीत मिश्रणाचा पर्याय आणला. तो पर्यायही बाद ठरल्यानंतर गेल्यावर्षी पालिका प्रशासनाने खड्डे बुजविण्यासाठी जिओ पॉलिमर, रॅपिड हार्डनिंग आदी पाच वेगवेगळे प्रयोग केले.



यंदा मात्र पालिका प्रशासनात आलेल्या नवीन अधिकाऱ्यांनी हे सर्व प्रयोग बाजूला सारून जुनाच मास्टिकचाच पर्याय वापरण्याचे ठरवले आहे. रस्त्यांचे आधीच सर्वेक्षण करून त्यानुसार खड्डे बुजविण्यावर भर दिला जाणार आहे. प्रत्येक परिमंडळासाठी एक कंत्राटदार नेमण्यात येईल. ९ मीटरपेक्षा मोठ्या रस्त्यांसाठी डांबरी मिश्रणाचा पुरवठा आणि ते मिश्रण वाहून नेण्यासाठी प्रत्येक वॉर्डला विशिष्ट प्रकारचे दोन कूकर आणि कामगार असा पुरवठा कंत्राटदाराला करावा लागणार आहे. नऊ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यासाठी एकाच कूकरचा पुरवठा करावा लागेल. मास्टिकचा पुरवठा करणारे कारखाने मोठ्या प्रमाणावर आहेत. फक्त कुकर पुरवणे, त्यातून मिश्रण वाहून नेणे आणि मिश्रण गरम असतानाच खड्डे बुजवणे ही कामगिरी करणे आव्हानात्मक आहे. खड्डे बुजविण्याचे काम रात्री केले जाणार, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### खड्डयांवरून खडे बोल

मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी पालिकेने जानेवारी २०२३ मध्ये सहा हजार कोटींची कामे दिली होती. मात्र त्यातील शहर विभागातील कामे सुरूच झाली नाहीत. उपनगरातील कामे धीम्या गतीने सुरू आहेत. त्यामुळे खड्डेमुक्त रस्ते हे स्वप्न दूरच राहिले आहे. त्यातच गेल्याच महिन्यात उच्च न्यायालयानेही पालिका प्रशासनाला खड्डयांवरून खडे बोल सुनावले आहेत. गेल्यावर्षीही २७३ कोटी खर्चूनही रस्ते खड्डयांतच असल्याबद्दल न्यायालयाने पालिकेला फटकारले होते.

### ३५६ किमी रस्त्यांचे काँक्रीटीकरण शिल्लक

मुंबईत एकूण २०५० किमी लांबीचे रस्ते असून आतापर्यंत त्यापैकी १२२४ किमी लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाले आहे. तर ३५६ किमी लांबीच्या रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे.

## प्रशासनाच्या संवेदनशीलतेमुळे बिल्डरच्या कचाट्यातून आदिवासी कुटुंबाची जमीन मुक्त



**ठाणे, प्रातिनिधी :** आदिवासीची जमिन कोणत्याही प्रकारची प्रक्रिया पूर्ण न करता त्यावर बांधकाम करणाऱ्या बिल्डरला महसूल विभागाने चांगलाच दणका दिला असून करोडो रुपये किंमतीची जमीन सरकार दरबारी जमा केली आहे. त्यामुळे आदिवासी भूधारकाला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. कोलशेत भागातील हिरानंदानी इस्टेट भागात ही बारा गुंठे जमिन असून ही जमिनी आदिवासी महिला मंदाकिनी गंगाड हिच्या नावावर असून एका प्रतिष्ठित बांधकाम व्यवसायिकाच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता या भूखंडावरील आरक्षण बदलून त्या भूखंडावर शाळेचे आरक्षण टाकले होते. आरक्षण बदल झाल्यानंतर त्या भूखंडाबाबत एका शाळा संचालकाबरोबर ९९ वर्षांचा करार करून त्या भूखंडावर ठाणे महापालिकेकडून शाळा इमारतीचा आराखडा देखिल मंजूर करून त्यावर बांधकाम सुरु केले होते. याबाबत एका जागरूक ठाणेकराने झालेल्या घोटाळ्याची तक्रार जिल्हाधिकारी आणि राज्य सरकारच्या महसूल विभागाकडे केली होती. त्या तक्रारीची गंभीर दखल घेऊन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही जमिन सरकारकडे जमा करून पुन्हा आदिवासी कुटुंबाला परत देण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार ठाणे जिल्हाधिकारी विभागाने ही जमिन सरकार जमा केली आहे. या निर्णयामुळे त्या बांधकाम व्यवसायिकाचे धाबे दणणाले आहेत.

# Virat Kohli on verge of achieving historic milestone in MI vs RCB IPL 2024 match, set to join Rohit Sharma in elite list



**Mumbai**


IPL 2024 is in full flow, with action-packed cricket being served to fans. On Thursday, Mumbai Indians take on Royal Challengers Bangalore in the latest fixture of the season, at the Wankhede Stadium. A win will be crucial for both teams, who are at the bottom-half of the points table. MI are currently eighth with two points in four matches (one win and three defeats). Meanwhile, RCB are ninth with two points in five games (one win and four defeats).

Faf du Plessis-led RCB are currently in a three-match losing streak. Meanwhile, Hardik Pandya led MI to their first win in their previous fixture. Despite RCB's poor form, Virat Kohli has been a constant force for RCB and has been their solitary performer at times during this season. The former RCB skipper leads the Orange Cap race with 316 runs in five matches, packed with a ton and two fifties. His high score this season is 84*. His strike rate of 146.29 has been a point of criticism for fans and experts. Going into his side's sixth fixture of the season, Kohli will be aiming to script history as he is only four sixes away from becoming the fourth batter in IPL history to reach 250 sixes.

Chris Gayle leads the pack with 357 sixes in 142 matches, followed by MI's Rohit Sharma (264 in 247 games). Meanwhile, AB de Villiers is third with 251 sixes in 184 fixtures and Kohli is fourth in the list with 246 currently, in 242 games. Meanwhile, CSK's MS Dhoni is fifth with 242 sixes in 255 matches.

In his side's previous game, he got a ton against Rajasthan Royals, taking RCB to 183/3 in 20 overs. Kohli smacked an unbeaten knock of 113 runs off 72 balls, packed with 12 fours and four sixes. Meanwhile, Yuzvendra Chahal took two wickets for RCB. Despite's Kohli's ton, RCB bowlers failed to defend a target of 184 runs as RR reached 189/4 in 19.1 overs, courtesy of a match-winning unbeaten ton from Jos Buttler (100* off 58 balls). Meanwhile, RR captain Sanju Samson (69) got a half-century. For RCB's bowling department, Reece Topley got two wickets.

# Wilson College gymkhana lease: HC allows UCNITA to file tenancy affidavit



**Mumbai**

The Bombay High Court on Wednesday granted United Church of Northern India Trust Association (UCNITA), which oversees the properties of Wilson College in Chowpatty, one week to submit its affidavit in the gymkhana lease dispute matter. This affidavit is expected to outline the grounds on which UCNITA claims its status as a tenant holding over, as per Section 116 of the Transfer of Property Act, 1882.

Additionally, UCNITA is tasked with providing facts supporting its assertion of lease renewal, based on a government policy decision dating back to June 23, 2017. The move comes as UCNITA tries to safeguard the over-110-year-old Wilson College Gymkhana on Marine Drive. The high court's decision stems from a plea filed by UCNITA, challenging the cancellation of the gymkhana's lease.

In December 2023, the district collector issued an order to reclaim the gymkhana land, citing instances of mismanagement and lease rule violations. This decision was upheld by the Maharashtra Revenue Tribunal through an order dated December 5, 2023. UCNITA's petition aims to challenge the tribunal's ruling, arguing that they were not provided with a fair hearing before the issuance of the order. In response, a bench presided over by Justice Amit Borkar has granted UCNITA one week to file its affidavit demonstrating its tenancy status. Moreover, the state has been given a corresponding week to submit its reply following UCNITA's affidavit. The matter has been slated for further deliberations on April 24.

# पनवेलमधून मोटारसायकल चोरी करणारी राजस्थानी टोळी गजाआड

## दिवसा दुकानात काम करून रात्री करायचे दुचाकी चोरी



■ **नवी मुंबई** : पनवेल, नवीन पनवेल, कामोठे या भागांमधून बुलेटसह इतर मोटारसायकली चोरून त्यांची परराज्यात विक्री करणाऱ्या टोळीतील त्रिकुटाला खांदेश्वर पोलिसांनी अटक केली आहे. जगदीश चुन्नीलाल माळी (२४), प्रवीण रामलाल सिरवी (२५) व अरविंदकुमार भवरलाल हिरागर (२४) अशी या त्रिकुटाची नावे आहेत. त्यांनी पनवेल, नवीन पनवेल व कामोठे भागांतून चोरलेल्या एकूण ८ लाख रुपये किमतीच्या ५ बुलेट व इतर ६ मोटारसायकली पोलिसांनी हस्तगत करून दुचाकी चोरीचे ११ गुन्हे उघडकीस आणले आहेत. या टोळीतील इतर दोन फरार आरोपींचा शोध पोलिसांकडून घेण्यात येत आहे. परिसरामध्ये काही दिवसांपासून बुलेट गाड्यांसह इतर मोटारसायकली चोरीच्या घटनात वाढ झाली होती. त्यामुळे परिमंडळ-२ चे पोलीस उपआयुक्त विवेक पानसरे यांनी सदर मोटारवाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होत्या. यादरम्यान, गत महिन्यात नवीन पनवेल भागातून स्प्लेंडर मोटारसायकल चोरीची घटना घडली. त्यानंतर खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या पथकाने सर्व चोरीच्या घटनास्थळांवरील सीसीटीव्ही फुटेजचा अभ्यास केला. त्यात त्यांना मोटारसायकल चोरांची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी गत आठवड्यातील सतत तीन दिवस सीसीटीव्ही फुटेजमधील संशयित आरोपींच्या लोकेशनचा मागोवा घेतला असता, सदर संशयित चोरटा त्याच्या इतर २ साथीदारांसोबत नवीन पनवेलमधील शिवा कॉम्प्लेक्स परिसरामध्ये असल्याचे समजले. तेव्हा पोलिसांनी पहाटेच्या सुमारास सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या चौकशीत त्यांनी बुलेट व इतर मोटारसायकली चोरी केल्याचे कबूल केले. चोरी केलेल्या दुचाकी कामोठे, नवीन पनवेल परिसरात विक्रीकरिता सोडून दिल्याचे तसेच काही गाड्यांचे नंबर बदलून ते त्यांनी पुणे शहरात, राजस्थानमधील पाली येथे पाठवून दिल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडून एकूण ८ लाख रुपये किमतीच्या ५ बुलेट व इतर ६ मोटारसायकली जप्त केल्या.

### अवघ्या काही मिनिटांत करत होते बुलेटची चोरी

चोरटे परिसरात रात्रीच्या सुमारास पार्क असलेल्या बुलेटचा शोध घेऊन बुलेटच्या चावीचे स्वीच काढून त्यातील दोन वायरी जोडून काही मिनिटांमध्ये बुलेट सुरू करून ते चोरून नेत होते. अशाच पद्धतीने या आरोपींनी पनवेल शहर, कामोठे या पोलीस ठाण्याच्या हद्दीतून प्रत्येकी १ बुलेट, तसेच खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ३ बुलेट चोरले होते, त्याचप्रमाणे इतर मोटारसायकली ही चोरल्या, स्प्लेंडर चोरताना सीसीटीव्हीत कैद झाल्याने ते पोलिसांच्या हाती लागले.

### दिवसा मारवाड्याच्या दुकानात, तर रात्री दुचाकी चोरीचे करत होता काम

या प्रकरणात अटक करण्यात आलेले तिन्ही आरोपी राजस्थानमधील मारवाड येथील पाली गावातील आहेत. हे तिघेही वेगवेगळ्या ठिकाणी मारवाडीच्या दुकानात काम करत होते. त्यानंतर रात्रीच्या सुमारास बुलेट व इतर मोटरसायकली चोरत होते. त्यानंतर चोरलेल्या दुचाकी ते राजस्थान व इतर भागांत विक्रीसाठी पाठवून देत होते.

# श्वानांना क्रूर वागणूक देणाऱ्या कामगारावर गुन्हा दाखल

## सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे मारहाणीचा प्रकार उघड

■ **नवी मुंबई** : पाळीव श्वानांचा सांभाळ करण्यासाठी कोपरखैरणे येथील ग्रुमबॉक्स पेटकेअर एलएलपी या दुकानात कामास ठेवण्यात आलेल्या कामगाराने तेथील श्वानांना हाताबुक्क्यांनी, लाकडी बांबू, लोखंडी पट्टी व श्वानांच्या गळ्यातील पट्ट्याने अमानुषपणे मारहाण करून श्वानांना क्रूर वागणूक दिल्याची धक्कादायक घटना दुकानात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे उघडकीस आली आहे. दिलीप कुमार साहू (२०) असे या कामगाराचे नाव असून, कोपरखैरणे पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

घणसोली येथे राहणाऱ्या लालिमा ठाकूर यांनी काही वर्षांपूर्वी कांचन या पार्टनरसह कोपरखैरणे सेक्टर-९ मधील बालाजी एक्झोटिकामध्ये पाळीव श्वानांचा सांभाळ करण्यासाठी ग्रुमबॉक्स पेटकेअर एलएलपी या नावाने दुकान सुरू केले होते. या दुकानात त्यांनी श्वानांचा सांभाळ करण्यासाठी दिलीप कुमार साहू याला कामाला ठेवले होते. त्यामुळे दिलीप कुमार साहू त्याच शॉपमध्ये राहून श्वानांची देखभाल करत होता. मात्र दिलीप साहू हा सदर शॉपमध्ये येणाऱ्या श्वानांना क्रूर वागणूक देऊन त्यांना अमानुषपणे मारहाण करत होता. काही श्वानांच्या मालकांनी याबाबत शॉप मालकांकडे तक्रार केल्यानंतर या शॉप मालकांनी सदर पेटकेअरमध्ये लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, त्यांना धक्कादायक प्रकार निदर्शनास आले.

श्वानांच्या देखभालीसाठी ठेवण्यात आलेल्या दिलीप साहू याने ६ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत सदर येथील श्वानांना अनेकवेळा हाताबुक्क्यांनी, लाकडी बांबू, लोखंडी पट्टी व श्वानांच्या गळ्यातील पट्ट्याने अमानुषपणे मारहाण करून जखमी केल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळून आले. प्राणीमित्र लालिमा ठाकूर यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन दिलीप साहू याला तत्काळ कामावरून काढून टाकून त्याच्या विरोधात कोपरखैरणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# नोकरीचे आमिष दाखवून दाम्पत्याला ८ लाखांचा गंडा

■ **मुंबई** : रेल्वेमध्ये बुकिंग क्लार्क, अनाऊंसर पदावर नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका दाम्पत्याकडून ८ लाख रुपये घेत त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा दाखल करून कांजुरमार्ग पोलीस अधिक तपास करीत आहेत.

कांजूरमार्ग पूर्वेकडील शास्त्रीनगर परिसरात राहत असलेले जयंत कोयंडे (३४) हे एका खासगी कंपनीत इव्हॅल्युएटर पदावर नोकरी करतात. त्यांची आत्या आणि आत्ते-मामा हे चेंबूरच्या घाटला गावात राहतात. कोयंडे हे सप्टेंबर २०२१ मध्ये गणेशोत्सवासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड येथील गावी गेले असताना आत्याने त्यांना त्यांच्या वाडीतील गोविंद बांदकर (५७) व्यक्ती मंत्रालयात आहे, तो आतल्या कोट्यातून रेल्वेमध्ये नोकर भरती करतो. त्यासाठी तो रोख पैसे घेतो. त्यामुळे तुम्ही पण नोकरीसाठी प्रयत्न करा, असे सांगितले.

यानंतर आत्ते-मामाने कोयंडे यांना बांदकर यांचा मोबाईल नंबर दिला. कोयंडे यांनी त्यांना कॉल केला असता एका महिलेने भरतीबाबत माहिती दिली. कोयंडे यांनी तिला आपल्याला आपल्या पत्नीला बुकिंग क्लार्क किंवा अनाऊंसरची नोकरीची मागणी केली. तिने या नोकरीसाठी १० लाख रुपयांची मागणी केली. त्यानंतर वैद्यकीय तपासणीला जाताना चार लाख रुपये आणि प्रशिक्षण पत्र आल्यानंतर चार लाख रुपये असे एकूण आठ लाख रुपये देण्याचे ठरले. तेव्हा कोयंडे यांनी एकूण ८ लाख रुपये मामाकडे दिले. त्यानंतर, फक्त बनावट अपॉईंटमेंट लेटर दिली गेली. तेव्हा कोयंडे यांनी कांजुरमार्ग पोलीस ठाणे गाठून गोविंद बांदकर यांच्यासह सुजीत नेसवणकर, सीमा नेसवणकर, रवी शर्मा यांच्या विरोधात तक्रार दिली आहे.

# वांद्र्यात पिस्तूल विक्रीसाठी आलेल्या आरोपीला बेड्या

■ **मुंबई** : वांद्रे पूर्व परिसरात पिस्तूल विक्रीसाठी आलेल्या एका २९ वर्षीय पोलीस अभिलेखवरील आरोपीला खेरवाडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. सलीम रफीक ऊर्फ शफीक शेख असे आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याच्या जवळून देशी बनावटीच्या पिस्तुलासह जीवंत कडतूस जप्त केले आहे. खेरवाडी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथक नेहमीप्रमाणे मंगळवारी रात्री गस्त घालत असताना सपोनि. गणपत गणेशकर यांना पोलीस अभिलेखवरील आरोपी स्वर्गद्वार मुस्लीम कब्रस्तानच्या पाठीमागच्या बाजूला असलेल्या गेटजवळ पिस्तूल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने सापळा रचून आरोपी सलीमला ताब्यात घेतले. अंगझडतीमध्ये सलीमने एका पिशवीत गुंडाळून पॅण्टमध्ये खोवलेले पिस्तूल पोलिसांना सापडले. पिस्तुलात एक जीवंत कडतूस होते. पोलिसांनी सलीमला पिस्तूलासह ताब्यात घेतले. चौकशीत सलीम हा मूळचा रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीचा रहिवासी असून, त्याच्या विरोधात चोरीचे ३ गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. अखेर, पोलिसांनी बेकायदेशीररीत्या पिस्तूल बाळगल्याचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या तिघांना अटक; दोघे फरार



■ यापकरणी निजामपूरा पोलिस ठाण्यात तिघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली असून त्यांच्या फरार साथीदारांचा शोध पोलिस घेत आहेत. आरोपींकडे कसून चौकशी केली असता त्यांच्यावर भिवंडीतील ४ पोलिस ठाण्यातर्गत ८ गुन्हे दाखल असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. तर यातील सुफीयानवर विविध गंभीर गुन्ह्यांमुळे हद्दपारीची कारवाई झाल्याचेही उघड झाले आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता ११ एप्रिल पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

■ **भिवंडी** : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीला आळा घालण्याचे आदेश ठाणे पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांनी भिवंडी परिमंडळ -२ क्षेत्रातील सर्वच पोलीस ठाण्यांना दिले आहेत. त्यानुषंगाने निजामपूरा पोलीस ठाण्याचे वपोनि संतोष आव्हाड व पोनि दीपक शेलार (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने सशस्त्रांसह दरोड्याच्या पूर्व तयारीत असलेल्या सराईत टोळीतील तिघांना पाठलाग करून बेड्या ठोकल्या आहे.

सुफियान भद्रे आलम अन्सारी (१९), सोहेल सनाउल्लाह शेख (२६), नईम जमाल अहमद सय्यद (१९ सर्व रा.भिवंडी) अशी अटक केलेल्या सराईत गुन्हेगारांची नावे आहेत. त्यांच्याकडून ८ गुन्ह्यांची उकल करून ७८ हजार ८१० रुपये किमतीची विविध प्रकारची सशस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. त्यांचे अन्य दोन साथीदार रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले आहेत. ९ एप्रिल रोजी पहाटे ४ वाजेच्या सुमारास भिवंडी पारोळ रस्त्यावरील तळवली नाका हद्दीत ५ ते ६ जण रिक्षातून सशस्त्रांसह फिरत असल्याची खबर सपोनि विनोद चव्हाण, पोऊनि जगदीश गीते, पोह मारुती भारती, पोना सुशीलकुमार धोत्रे, नीलकंठ खडके, पोकॉ इब्राहिम शेख, सांबरे पोशि बापू गायकवाड या पोलिस पथकाला गुप्त बातमीदारा मार्फत मिळाल्याने पोलिस पथकाने तळवली नाका येथील स्मशनभूमी जवळील रस्त्यावर सापळा रचला होता. त्यावेळी संशयित ऑटो रिक्षा भरधाव वेगात जाताना दिसली.

पोलिसांनी रिक्षा थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र संशयितांनी पळ काढला असता पोलिसांनी पाठलाग करून रिक्षा अडवली. त्यानंतर तिघांना ताब्यात घेऊन रिक्षाची झाडझडती करून अवैध देशी बनावटीचे अग्निशस्त्रे, जिवंत काडतूस व धारदार हत्यार असा एकूण ७८ हजार ८१० रुपये किमतीचा घातक साठा पोलिसांनी जप्त केला आहे.

# खोटी बिले पाठवून कंपनीची ५ कोटी ८९ लाख रुपयांची फसवणूक



■ **मुंबई** : झारखंडमध्ये लोखंडी सळ्यांची निर्मिती करणाऱ्या कंपनीला वाहतूक खर्चाची वाढीव बिले पाठवून कंपनीची तब्बल ५ कोटी ८९ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी अंधेरी पोलिसांनी लॉजिस्टिक कंपनीचे संचालक संतोष अय्यर आणि सुधा पै यांच्यासह कंपनीचे महाव्यवस्थापक व्ही. बास्कर यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कांदिवली, चारकोप परिसरात राहत असलेले तक्रारदार राजदीप सैनी हे समृद्धी स्पॉज लि. आणि एम्मार इलॉईज प्रा. लि. कंपनीचे कायदेशीर सल्लागार आहेत. त्यांच्या कंपनीचे कार्यालय अंधेरी पूर्वेकडील चकाला परिसरात तर, कंपनीचे उत्पादन झारखंडमधील आदितपूर येथे आहे. कंपनीमध्ये लोखंडाच्या सळ्या तयार करण्यात येत असल्याने कंपनी मोदी माईन्स व खजुराओ माईन्स नावाच्या लोखंडी दगडाच्या खाणीतून कच्चा माल खरेदी करते. २०२१ मध्ये फहीम खान नावाच्या एका दलालाने कंपनीच्या संचालकांना कर्नाटक, बंगळुरू येथील मुद्दसर मोहम्मद आणि दीपेश कोरंजरथ हे संचालक असलेल्या मुलूरा लॉजिस्टिक प्रा. लि. ट्रान्सपोर्ट कंपनीची ओळख करून दिली. सैनी यांच्या कंपनीने कच्चा माल पुरविण्यासाठी ट्रान्सपोर्टचे काम दिले. काही महिन्यांनी मुलूरा लॉजिस्टिक कंपनीकडून बिलाचे पैसे वेळेवर मिळत नसल्याची तक्रार स्थानिक ट्रान्सपोर्टर कंपन्यांनी केली. सैनी यांच्या कंपनीने मुलूरा कंपनीला याबाबत विचारणा करून त्यांना वर्क ऑर्डर देणे बंद केले. कंपनीने वेळेवर पेमेंट करण्याचे आश्वासन देत वर्क ऑर्डर पुन्हा मिळवली. जानेवारी २०२२ मध्ये मुलूरा कंपनीचे सर्व शेअर्स खरेदी करून डीएचएल कंपनीने कंपनी टेकओव्हर केली. त्यामुळे कंपनीचे संचालक संतोश अय्यर आणि सुधा पै बनले. पुढे डीएचएल कंपनीच्या ईमेलवरून सैनी यांच्या कंपनीकडे ३ कोटी ९८ लाख ८२ हजार ४६ रुपयांच्या जास्तीच्या बिलाची मागणी करण्यात आली. सैनी यांच्या कंपनीने याबाबत चौकशी सुरू केली. मुलूरा कंपनी इनव्हाईस व बिले देत नव्हती. त्यामुळे, सैनी यांच्या कंपनीने या कंपनीचे पेमेंट थांबवत केलेल्या लेखापरीक्षणात मुलूरा कंपनीने सैनी यांच्या कंपनीला ट्रान्सपोर्टरचा जास्तीचा माल पाठविल्याचे भासवून एकूण ५ कोटी ८९ लाख ३८ हजार ४५० रुपयांचे बनावट इनव्हाईस तयार करून कंपनीची फसवणूक केल्याचे उघड झाले. मुलूरा कंपनीचे महाव्यवस्थापक व्ही. भास्कर यांनी कंपनीच्या मेल आयडीवरून काही इनव्हाईस/बिले पाठवली. त्यांना आवश्यक कागदपत्रे जोडली नव्हती. काही पावत्यांवर सैनी यांच्या कंपनीचा बनावट शिक्का अशा तब्बल १ हजार १५४ खोट्या नोंदी असल्याचे उघड झाले. मुलूरा कंपनीने सैनी यांच्या कंपनीला एकूण ९ कोटी ४४ लाख ४८ हजार ८७९ रुपये रकमेची खोटी बिले सादर करून कंपनीकडून ५ कोटी ८९ लाख ३८ हजार ४५० रुपये घेऊन फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# प्रेयसीचे विवस्त्र फोटो-व्हिडीओ प्रियकराने केले व्हायरल

■ **नवी मुंबई** : प्रियकर विवाहित असल्याचे समजल्यानंतर प्रेयसीने प्रिकरासोबतचे संबंध तोडल्यामुळे संतप्त झालेल्या प्रियकराने प्रेयसीचे त्याच्या सोबतचे नग्नावस्थेतील फोटो व व्हिडीओ तिच्या होणाऱ्या पतीला व नातेवाईकांना पाठवून तिची बदनामी केल्याची धक्कादायक घटना पनवेलमध्ये उघडकीस आली. दत्तात्रय दिनकर सूर्यवंशी (२७) असे या प्रियकराचे नाव असून, पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात बलात्कारासह विनयभंग तसेच आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून सदरचा गुन्हा भिवंडीतील नारपोली पोलीस ठाण्यात वर्ग केला आहे. या घटनेतील २२ वर्षीय पीडित तरुणी सध्या पनवेल भागात राहण्यास असून, आरोपी दत्तात्रय सूर्यवंशी हा ऐरोलीत राहण्यास आहे. वर्षापूर्वी हे दोघेही एकत्र कामाला असताना त्यांची भेट झाली होती. त्यानंतर दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर आरोपी दत्तात्रय सूर्यवंशी याने पीडित तरुणीवर भिवंडी, मानकोली गावातील त्याच्या घरामध्ये पीडित तरुणीवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले होते. मात्र, काही महिन्यांपूर्वी दत्तात्रय सूर्यवंशी हा विवाहित असल्याचे पीडित तरुणीला समजले होते. त्यामुळे पीडित तरुणीने त्याच्या सोबतचे संबंध तोडून टाकले होते. मात्र, पीडित तरुणीने पूर्वीप्रमाणेच त्याच्यासोबत प्रेमसंबंध सुरू ठेवावेत, यासाठी दत्तात्रय सूर्यवंशी तिच्यावर दबाव टाकत होता. मात्र, पीडित तरुणीने त्याच्या सोबत प्रेमसंबंध ठेवण्यास स्पष्ट नकार दिला होता. त्यानंतर पीडित तरुणीने लग्नासाठी मुलगा शोधून त्याच्या सोबत लग्नाची तयारीदेखील सुरू केली होती. ही बाब आरोपी दत्तात्रय सूर्यवंशी याला समजल्यानंतर त्याने पीडित तरुणीचे लग्न मोडावे, यासाठी त्याने पीडित तरुणीच्या होणाऱ्या पतीला व तिच्या भावाला त्याच्या सोबतचे नग्नावस्थेतील फोटो व व्हिडीओ पाठवून तिची बदनामी केली. याबाबत पीडित तरुणीने व तिच्या भावाने त्याला जाब विचारला असता, उलट त्याने त्यांनाच धमकावले. या प्रकारानंतर पीडित तरुणीने पनवेल शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# कासारवडवलीत देशी पिस्तूल बाळगणारा अटकेत

■ **ठाणे** : ठाण्याच्या घोडबंदर रोडवरील कासारवडवली पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर प्राणघातक शस्त्र बाळगणाऱ्या एका तरुणास कासारवडवली पोलिसांनी बुधवारी पहाटे अटक करून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. बेकायदेशीर प्राणघातक शस्त्र बाळगणाऱ्या विकास जगन अडसुळ(२२) यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे पोलीस पथकाला देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस आढळले. ही गोपनीय माहिती कासारवडवली पोलिसांना मिळाली होती.

# अपघात रोखण्यासाठी भिवंडीत अवजड वाहनांना 'नो एण्ट्री'


## वाहतूक विभागाची गुढीपाडव्यापासून अधिसूचना लागू






■ **भिवंडी** : भिवंडी शहरातून वाडा, नाशिक, मुंबई, अंजूरफाटाकडे जाणाऱ्या व येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना भिवंडी शहरात प्रवेश करण्यास २४ तास बंदी घालण्यात आली आहे. गुजरातला जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांनी वाडा मार्गे जाण्यासाठी वंजारपट्टी नाका उडडाण पुलावरून जाण्यासाठी अधिसूचना ठाणे शहर वाहतूक विभागामार्फत काढण्यात आली आहे. त्यामुळे शहरा बाहेरील जड वाहनांमुळे शहरात होणारे अपघात नियंत्रित होणार आहेत. गुढीपाडव्यापासून ही अधिसूचना लागू केली आहे.

भिवंडी शहर हे मुंबई महानगर प्रदेशाचे प्रवेशद्वार असल्याने गुजरात कडून मुंबईकडे व मुंबईकडून परत गुजरातकडे त्याचप्रमाणे गुजरातकडून नाशिककडे व नाशिककडून गुजरातकडे जाणाऱ्या जड, अवजड वाहनांची भिवंडी शहरातून मोठया प्रमाणावर वाहतूक सुरू असते. ही वाहतूक संक्रमण प्रकारची आहे. भिवंडी शहरामध्ये मोठा वस्त्रोद्योग व्यवसाय असल्याने त्यांच्याशी पुरक यंत्रमाग डाईंग, सायझिंग असे कारखाने मोठया प्रमाणात आहेत. तसेच शहरामध्ये प्लास्टिक मोती बनवण्याचा उद्योग मोठया प्रमाणात आहे. तसेच भिवंडी हे लॉजिस्टीक पार्कने हब म्हणून ओळखले जाते. त्यामुळे या शहरातून मोठया प्रमाणात जड, अवजड मालवाहू वाहनांची वाहतूक सुरू असते. शहरातील माल वाहतूकीच्या वाहनांच्या मार्गावर शासकीय कार्यालये, न्यायालय, उप-जिल्हा रुग्णालय, बाजारपेठा, बँका, दवाखाने, शाळा, महाविद्यालय असून शासकीय कर्मचारी, दैनंदिन व्यवहाराकरता येणारे जाणारे नागरिक, मोठया प्रमाणात असतात. त्यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडी होवून सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच या व्यवसायिक वाहनांमुळे छोटे-मोठे अपघात, प्राणांतिक अपघात तसेच प्राणहानी सुद्धा झालेली आहे. त्यामुळे भिवंडी शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच या मार्गावर नेहमी वाहतूक कोंडी होते. या परिसरातील वाहतूक सुरळीत राहावी आणि वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून जनतेच्या सोईसाठी ठाणे शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपआयुक्त डॉ. विनयकुमार राठोड यांनी अधिसूचना जारी केली आहे.





◆ भिवंडी महानगराची लोकसंख्या सुमारे ९ लाखापर्यंत पोहोचलेली असून ठाणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या अभिलेखानुसार २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत भिवंडी शहरात सर्व प्रकारची वाहने मिळून ३,९९,६८३ वाहनांची नोंद करण्यात आलेली आहे.

◆ या व्यतिरिक्त भिवंडी शहर औदयोगिक शहर असल्याने येथे बाहेरून येणाऱ्या वाहनांची संख्या देखील मोठी आहे. त्यामुळे शहरातून होणारी जड, अवजड वाहनांना शहरातून वाहतूक करण्यास बंदी करावी यासाठी लोकप्रतिनिधींनी आणि नागरिकांनी सरकारकडे मागणी केली होती.

# भिवंडीत पगार थकलेल्या कामगाराचा मालकावर चाकू हल्ला

■ **ठाणे** : पगार थकलेल्या कामगाराने मालकाकडे थकीत पगाराची मागणी केली असता मालकाने दहा दिवसानंतर थकीत पगार देण्याचे आश्वासन दिल्यानंतर दोघांमध्ये झालेल्या बाचाबाची व वादातून कामगाराने मालकावर चाकू हल्ला केल्याची खळबळ जनक घटना पूर्णा गावातील अरिहंत कंपाउंड येथे घडली आहे. राकेश रामनरेश सिंग वय ४५ वर्ष रा. वालीव पालघर असे चाकूहल्ल्यात जखमी झालेल्या कंपनी मालकाचे नाव आहे. राकेश सिंग यांचे भिवंडीतील पूर्णा गावातील अरिहंत कंपाउंड येथे पीव्हीसी कंपनी असून या कंपनीत अमित सोमय प्रजापती वय २३ वर्ष हा कामगार काम करत होता. त्याने कंपनीत केलेल्या कामाचे पैसे मागण्यासाठी हा बुधवारी कंपनीत गेला होता यावेळी कंपनी मालकाने कामगाराला दहा दिवसांची मुदत देऊन पैसे देण्याचे कबूल केले यावरून दोघांमध्ये वाद झाल्यानंतर त्याने मालकाला शिवीगाळ करून मारहाण केली व पॅन्टच्या खिशात ठेवलेल्या चाकूने मालकाच्या छातीवर चाकू खुपसून कंपनी मालक राकेश सिंग यांना गंभीर जखमी केले. याप्रकरणी कंपनीत काम करणारे कामगार शिवम रायकर यांनी नारपोली पोलीस ठाण्यात अमित प्रजापती याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. नारपोली पोलिसांनी आरोपी अमित प्रजापती यास अटक केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आशिष पवार करीत आहेत.

# अक्षय कुमारच्या फिल्म प्रॉडक्शन कंपनीच्या नावाने फसवणूक



■ **मुंबई** : बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमार याच्या केप ऑफ गुड फिल्म्स कंपनीतून बोलत असल्याची बातावणी करत एका तरुणीला निर्भया केसवर आधारित चित्रपटासाठी निवड केल्याचे सांगून पैसे उकळण्यात आल्याचा प्रकार जुहूमध्ये समोर आला आहे. जुहू पोलिसांनी याप्रकरणी ठग प्रिन्सकुमार राजन अंजनीकुमार सिन्हा (२९) याला बेड्या ठोकल्या आहेत.

खारमधील रहिवासी पूजा आनंदानी (२८) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, ३ एप्रिलला एका अनोळखी व्यक्तीने त्यांना कॉल करून अभिनेता अक्षय कुमार याच्या केप ऑफ गुड फिल्म्स कंपनीतून रोहन मेहरा बोलत आहे. तुमचे नाव एका प्रोजेक्टसाठी शॉर्ट लिस्ट झाल्याचे सांगितले.

पूजाने प्रोजेक्टबाबत अधिक चौकशी केली असता निर्भया प्रकरणात महिला सक्षमीकरणावर प्रोजेक्ट असल्याचे सांगितले.

पूजाने होकार दिल्याने मेहराने तिला काही फोटो आणि माहिती शेअर करण्यास सांगून विलेपार्ले परिसरात भेटण्यास सांगितले. ठरल्याप्रमाणे विलेपार्ले येथे मेहरा याने तिची भेट घेऊन एक स्क्रिप्ट वाचण्यास दिली. स्क्रिप्टवर अभिनेता अक्षय कुमारची सही असल्याचे दाखवून भूमिकेबाबत माहिती सांगितली.

पूजाने, सहकलाकारांबाबत विचारणा केली असता अभिनेता अक्षय कुमार, बॉबी देओल, अभिनेत्री राधिका आपटे, रिचा चड्ढा असल्याचे सांगितले. तसेच तिला या पात्रासाठी १२ ते १५ लाख रुपये मिळतील, असे आमिष दाखवले. मेहराने तिला ऑडिशनसाठी एक व्हिडीओ बनवून पाठवण्यास सांगितले.

अभिनेता अक्षय कुमारसोबत काम करण्याची संधी मिळणार असल्याने पूजाने व्हिडीओ बनवून पाठवला. पुढे ४ एप्रिलच्या सकाळी मेहराने तिला कॉल करून निवड झाल्याचे सांगून रात्री भेटण्यास सांगितले.

भेटीदरम्यान त्याने तिला वजन कमी करण्याचा सल्ला देत महानायक अमिताभ बच्चन यांच्यासोबत फोटोशूट करून पोर्टफोलिओ तयार करण्यासाठी सहा लाख रुपयांची मागणी केली. पूजाने याबाबत कुटुंबीयांना सांगितले असता तिच्या वडिलांना संशय आला. त्यांनी, तिला संबंधित प्रोडक्शन हाऊसच्या कार्यालयाशी संपर्क साधण्यास सांगितले.

पूजाने अक्षय कुमार यांच्या पीएचा क्रमांक मिळवून रोहन मेहरा बाबत चौकशी केली असता अशा नावाची व्यक्ती तेथे काम करत नसल्याचे समजले.

वडिलांच्या सांगण्यावरून पूजाने मेहराला ९ तारखेला जुहू परिसरातील एका हॉटेलमध्ये भेटण्यासाठी बोलावले आणि याची माहिती जुहू पोलिसांना दिली.

पोलीस पथकाने रोहन मेहराला ताब्यात घेत पोलीस ठाण्यात आणले. पोलीस तपासात त्याचे खरे नाव प्रिन्सकुमार राजन अंजनीकुमार सिन्हा (२९) असल्याचे उघड झाले. सिन्हा हा कास्टिंग करण्याचे काम करत असून विलेपार्लेतील रहिवासी आहे.